सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com | E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २११ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २० सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## या जगात भारताचा केवळ एकच शत्रू...; पंतप्रधान नरेंद्र मोदींचं वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी (२० सप्टेंबर) गुजरातमधील भावनगर येथे आयोजित एका रोड शोमध्ये सहभागी झाले होते. यावेळी मोदी यांनी ३४,२०० कोटी रुपयांच्या विकासकामांचं उद्घाटन आणि भूमिपूजन केलं. त्यानंतर मोदी यांनी एका जाहीर सभेला संबोधित केलं. यावेळी मोदी म्हणाले, या जगात आपला कोणीही शत्रू नाही. भारताचा कोणी शत्रू असेल तर तो म्हणजे इतर देशांवरील आपलं अवलंबित्व. आपण आत्मनिर्भर (स्वावलंबी) झालो तर या शत्रूवर आपण सहज मात करू शकतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, भारत आज विश्वबंधूच्या भावनेने मार्गक्रमण करत पुढे जात आहे. या जगात आपला कोणीही मोठा शत्रू नाही. खऱ्या अर्थाने आपला कोणी मोठा शत्रू असेल तर तो म्हणजे आपलं दुसऱ्या देशावरील अवलंबित्व. तोच आपला सर्वात मोठा शत्रू आहे. आपण सर्वांनी मिळून भारताच्या या शत्रूला पराभूत करुया. दुसऱ्या देशावरील अवलंबित्व नावाच्या या शत्रूला आपण पराभूत केलंच पाहिजे. कुठल्याही स्थिती आपल्याला त्यावर मात करावी लागेल.

मोदी म्हणाले, आपण दुसऱ्या देशावर अवलंबून राहून चालणार नाही. आपण इतर देशांवर जितके अवलंबून



राहू तितकी आपली अधोगती होत राहील आणि ते आपलं खूप मोठं अपयश असेल. जगभरात शांतता, स्थिरता आणि समृद्धीसाठी जगात सर्वात मोठी लोकसंख्या असलेल्या या आपल्या देशाला स्वावलंबी व्हावंच लागेल. आपण दुसऱ्या देशांचे आश्रित बनून राहिलो तर आपला आत्मसन्मान दुखावेल. १४० कोटी लोकसंखेच्या या देशाचं भविष्य आपण दुसऱ्या देशांच्या हाती सोपवू शकत नाही.

आपण देशाच्या विकासाचा संकल्प केला आहे. हा सकंल्प आपण दुसऱ्या देशांवर सोडू शकत नाही. आपण दुसऱ्या देशांवर अवलंबून राहून विकासाचा संकल्प पूर्ण करू शकत नाही. आपण आपल्या पुढच्या पिढीचं भविष्य इतरांच्या, इतर देशांच्या हाती सोपवू शकत नाही. त्यांचं भविष्य पणाला लावू शकत नाही. त्यामुळे मी सांगतोय ते लक्षात घ्या, शंभर आजारांवर एकच औषध आहे, ते म्हणजे स्वावलंबन. आपण जितके स्वावलंबी होऊ तितकेच पुढे जाऊ.

पंतप्रधान म्हणाले, आपल्या सरकारने देशातील नागरिकांनी एक छान भेट दिली आहे. जीएसटीमध्ये (वस्तू व सेवा कर) मोठ्या प्रमाणात कपात करून आपल्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंसह वाहनांपर्यंतच्या असंख्य गोष्टी स्वस्त झाल्या आहेत. त्यामुळे आपण आगामी सण मोठ्या उत्साहात साजरे करू शकू.

## आतापर्यंत गोट्या खेळत होतास का? खिशातून हात काढ

### रोहित पवार सरकारी अधिकाऱ्यावर भडकले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०जामखेड**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी कर्जतनंतर जामखेडमध्ये देखील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी विभागीय अधिकाऱ्यांची संयुक्त आमसभा घेतली. मात्र या सभेदरम्यान एका अधिकाऱ्याच्या वागणुकीमुळे वातावरण तापले आणि रोहित पवारांनी संतापत त्याला जाहीरपणे झापलं. संबंधित घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला असून, रोहित पवारांच्या वर्तनावर सोशल मीडियावर चर्चा रंगली आहे.



जामखेडमधील सार्वजनिक समस्या आणि विकासकामांबाबत नागरिकांची थेट माहिती घेण्यासाठी आमदार रोहित पवार यांनी प्रशासनासमवेत बैठक घेतली होती. या बैठकीदरम्यान कार्यकर्त्यांने एका कामासंदर्भात प्रश्न उपस्थित केला.पण संबंधित अधिकाऱ्याने गोलमोल उत्तर दिल्यानं रोहित पवार चांगलेच भडकले. त्यांनी स्पष्ट शब्दांत अधिकाऱ्याला फटकारलं.

संतप्त रोहित पवार यांनी अधिकाऱ्याला उद्देशून म्हणाले की, आतापर्यंत गोट्या खेळत होता का? तक्रार करणारे नागरिक बावळट आहेत का? वेडे आहेत का? तू मिजासखोर होऊ नकोस! यातच अधिकाऱ्याने खिशात हात घालून उभं राहिल्याचं पाहून रोहित पवारांनी आणखी कडक शब्दांत सुनावलं. आधी खिशातून हात काढ. तू लय शहाणा झालास वाटतं. लोकं इथे आलेत म्हणजे काहीतरी चुकीचं घडलं आहे. हा तुमच्या बापाचा पैसा नाही, हा लोकांचा पैसा आहे. काम चांगल्या दर्जाचं व्हायला हवं. तुमचे पराक्रम आम्हाला माहिती आहेत. एवढं लक्षात ठेवा, यापुढे गोंधळ चालणार नाही, अशा शब्दांत रोहित पवारांनी अधिकाऱ्यांची कानउघडणी केली.

## ट्रम्प यांच्या एका निर्णयाने अमेरिकेतील भारतीयांची धाकधूक वाढली

### मायक्रोसॉफ्टने कर्मचाऱ्यांना पाठवला तातडीचा ईमेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या क-१इ व्हिसासंदर्भातील नव्या नियमांमुळे अमेरिकेत काम करणाऱ्या भारतीय कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. हा नियम लागू होण्यापूर्वीच, अमेरिकेतील दिग्गज आयटी कंपनी मायक्रोसॉफ्टने तिच्या क-१इ व्हिसाधारक कर्मचाऱ्यांसाठी एक महत्त्वाचा आणि तातडीचा ई-मेल पाठवला आहे. या ई-मेलमध्ये, कंपनीने भारतात असलेल्या कर्मचाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत २१ सप्टेंबरपर्यंत अमेरिकेत परत येण्याचे आदेश दिले आहेत.




ट्रम्प यांच्या नव्या नियमानुसार, २१ सप्टेंबर २०२५ पासून अमेरिकन कंपन्यांना परदेशी कर्मचाऱ्यांच्या प्रवेशासाठी किंवा पुन्हा प्रवेशासाठी प्रत्येक क-१इ अर्जावर १ लाख डॉलर (सुमारे ८८.१० लाख रुपये) शुल्क भरावे लागेल. या नियमाचा फटका H-1B व्हिसा असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना बसणार आहे. जर एखादा क-१इ व्हिसाधारक कर्मचारी भारतात सुट्टीवर आला असेल, तर त्याला पुन्हा अमेरिकेत परत जाण्यासाठी कंपनीला हे शुल्क भरावे लागेल. जोपर्यंत कंपनी हे शुल्क देत नाही, तोपर्यंत त्या कर्मचाऱ्याला अमेरिकेत प्रवेश दिला जाणार नाही.

सूत्रांनुसार, मायक्रोसॉफ्टने अंतर्गत सूचना जारी करत म्हटले आहे की, २१ सप्टेंबरनंतर अमेरिकेबाहेर असलेल्या कोणत्याही क-१इ कर्मचाऱ्याला परत येण्याची परवानगी दिली जाणार नाही, जोपर्यंत त्यांच्या कंपनीकडून १ लाख डॉलर शुल्क भरले जात नाही. कंपनीने असेही म्हटले आहे की, हे शुल्क फक्त उच्च-स्तरीय किंवा अत्यंत आवश्यक भूमिका असलेल्या कर्मचाऱ्यांसाठीच भरले जाईल.

यामुळे, इतर विदेशी कर्मचाऱ्यांच्या नोकरीत कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी त्यांना २१ सप्टेंबरपर्यंत अमेरिकेत परतणे अनिवार्य आहे. कंपनीने अमेरिकेत असलेल्या H-1B व्हिसाधारकांनाही त्यांच्या प्रवासाचे सर्व बेत रद्द करून अमेरिकेतच राहण्याचा सल्ला दिला आहे. जरी क-४ व्हिसाधारकांचा थेट उल्लेख नसला तरी, त्यांच्या जोडीदार आणि मुलांनाही आंतरराष्ट्रीय प्रवास टाळण्यास सांगितले आहे.

## छत्री, काठी अन् दगड, त्र्यंबकेश्वरमध्ये गावगुंडांकडून पत्रकारांना बेदम मारहाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नाशिक**

नाशिकमध्ये पत्रकारांना गावगुंडानी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. नाशिकमधील इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या पत्रकारांना त्र्यंबकेश्वरमध्ये मारहाण करण्यात आली. या मारहाणीमध्ये ३ ते ४ पत्रकार जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सध्या रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. या मारहाणीचा व्हिडीओ समोर आला असून तो व्हायरल होत आहे. या घटनेवर संताप व्यक्त केला जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, त्र्यंबकेश्वरमध्ये वृत्तांकनासाठी जात असताना इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या पत्रकारांना मारहाण करण्यात आली. स्वामी समर्थ केंद्रजवळील गाड्यांच्या प्रवेशाची पावती घेणाऱ्या गुंडांकडून पत्रकारांना बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीमध्ये तीन ते चार पत्रकार गंभीर जखमी झाले आहेत. किरण ताजने, योगेश खरे आणि अभिजित सोनवणे यांना छत्री, काठी आणि दगडाने मारहाण करण्यात आली. त्र्यंबकेश्वरच्या शासकीय रुग्णालयात या सर्व जखमी पत्रकारांवर उपचार सुरू आहेत. पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरू आहे.


मंत्री छगन भुजबळ यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना संताप व्यक्त केला. पत्रकारांना अशी वागणूक तर पर्यटकांना काय वागणूक देणार? असा सवाल छगन भुजबळ यांनी विचारला आहे. त्यांनी सांगितले की, 'त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करा. अतिशय कडक कारवाई झाली आहे. त्याठिकाणचे पोलिस काय करत आहे. त्यांना माहिती नाही का ही लोकं कोण आहेत? मीडियाची लोकं एकत्र होती म्हणून ही घटना बाहेर आली. जर एखादा एकटा व्यक्ती असेल तर त्याच्यासोबत काय होईल. या घटनेची चौकशी झाली पाहिजे.'

पत्रकारांना त्रास होणार नाही. मी पोलिस आणि यंत्रणांशी बोलतो. पुन्हा अशा घटना घडणार नाही याची काळजी घ्यावी. दादागिरी आणि मारामारी काय कामाची आहे. तुमच्या त्र्यंबकेश्वर गावाचे महत्व वाढवण्याचे काम मीडिया करत आहे. असं जर असेल तर कसं होईल. पोलिसांनी करावाई करावी. मनात आणले तर पोलिस कारवाई करू शकतात. या गावगुंडाचे पोलिस रेकॉर्ड तपासा. ज्यांनी त्यांना ही अथोरिटी दिली त्यांनाच जाब विचारावा लागेल की कुठल्या प्रकारची माणसं तुम्ही नेमली आहेत. पत्रकारांसोबत असे जर वागत असाल तर जगभरातील लोक येतात त्यांना काय वागणूक देणार. या प्रकरणआला पूर्णपणे न्याय देऊ.

## राज्यात पीक पेरा नोंदणी ४७ टक्केच नोंदणीस दुसऱ्यांदा ३० पर्यंत मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

सततचा पाऊस अतिवृष्टी, नदीनाल्यांना पूर, रस्ते चिखलात व वारंवार सर्व्हरमध्ये तांत्रिक दोष यामुळे राज्यात १.६९ कोटी हेक्टरपैकी ८१.०४ लाख हेक्टर क्षेत्रात म्हणजेच ४७.८९ टक्के क्षेत्रात १४ सप्टेंबरपर्यंत मोबाइल पने पीक पेरा नोंदविण्यात आला. या



कालावधीत ६० टक्के नोंद अपेक्षित आहे. आता पुन्हा शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणीला राज्याचे जमाबंदी आयुक्त डॉ. सुहास दिवटे दुसऱ्यांदा ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचे पत्र सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठविले आहे.

शेतकऱ्यांना हमीभावाने शेतमालाची विक्री करावयाची असल्यास तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यायचा असेल, तर पिकांची ई-पीक पाहणी आवश्यक आहे.

याशिवाय शासनाने आता पीक विमा, पीक कर्ज, शासन अनुदान वाटप आदींसाठी ई-पीक पाहणी आवश्यक केली आहे. पिकांचा ऑनलाइन पेरा नोंदीशिवाय शेतकऱ्यांना शासन योजनांचा लाभ मिळत नाही.

## गरब्यात मुस्लिमांना प्रवेश नको:नवरात्रोत्सवात विश्व हिंदू परिषदेच्या भूमिकेने नव्या वादाला तोंड

### हे भूषणावह नाही म्हणत ठाकरेंची शिवसेना, काँग्रेसचा विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

नवरात्रोत्सवातल्या गरब्यामध्ये मुस्लिमांना प्रवेश नाही, अशी भूमिका विश्व हिंदू परिषदेने घेतल्याचे समजते. नागपूरमधील गरबा आयोजकांना त्यांनी तशा सूचना दिल्यात. त्यामुळे ऐन नवरात्रोत्सवापूर्वी खडाखडी सुरू झालीय. देशात धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते संजय राऊत यांनी केलाय, तर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी त्यांना धर्माच्या नावावर राजकारण करून पोळी शेकायची आहे, असा आरोप केलाय.

देशभरात सोमवारी, २२ सप्टेंबर रोजी घटस्थापना होईल. त्या पार्श्वभूमीवर गरबा आयोजकांनीही जोरदार तयारी सुरू केलीय. राज्यभरात ठिकठिकाणी छोट्या शहरांपासून ते थेट मेट्रो सिटीपर्यंत गरब्यासाठी स्टेज, मंडप उभारणी सुरूय. मात्र, तत्पूर्वीच आरोप-प्रत्यारोपाची राळ उठलीय.

नवरात्रोत्सव फक्त हिंदूचा आहे. त्यामुळे गरब्यामध्ये मुस्लिमांना प्रवेश नको. गरब्यामध्ये प्रवेश देण्यापूर्वी आधारकार्ड तपासा. त्यानंतर प्रवेश द्या. मुस्लिम तरुणांनी गरब्यामध्ये प्रवेश केला, तर त्यांना पोलिसांच्या ताब्यात द्या, अशा सूचना विश्व हिंदू परिषदेने नागपूरमध्ये गरबा आयोजकांना दिल्याचे समजते. त्याचे पडसाद राजकीय क्षेत्रातही उमटताना दिसत आहेत. येणाऱ्या काळात



महापालिका निवडणुका आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरेंची शिवसेना, काँग्रेस आक्रमक झालीय. त्यांनी या भूमिकेला विरोध केलाय.

प्रत्येक गरब्यावर बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांची करडी नजर असणार आहे. विश्व हिंदू परिषद या संदर्भात पोलिसांशी भेट घेऊन त्यांनाही पत्र देणार असल्याचे समजते. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दल या दोन्ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवारातील शाखा आहेत. मात्र, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून या वर्षी यावर अजून तरी कोणीही प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यांची भूमिका काय असते, याकडे साऱ्यांचे लक्ष आहे. दरम्यान, मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रातही यापूर्वी अनेकदा विश्व हिंदू परिषदेने अशी भूमिका घेतलीय.

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते संजय राऊत यावर आक्रमक झालेत. ते म्हणाले की, या देशामध्ये अशाप्रकारे धार्मिक, धर्मांध वातावरण निर्माण करण्याचे काम चालू आहे आणि हीच त्यांची रोजी रोटी आहे. मी अगदीच सर्वधर्मसमभावाच्या गोष्टी कधीच करणार नाही.

संजय राऊत म्हणाले की, 'ज्या प्रकारे विष पेरण्याचे काम चालले आहे, ते महाराष्ट्राला आणि देशाला भूषणावह नाही, असे उत्तर राऊत यांनी माध्यमांशी बोलताना दिले. ठाकरे गटाने या विषयावर दोन वर्षांपूर्वीही अशीच भूमिका घेतली होती. त्याचीच पुनरावृत्ती राऊत यांनी आज केली.'

## संपादकीय ......

# मोदी - पुतीन : सामरिक मैत्रीचे नवे पर्व

एकीकडे पाश्चात्त्य जगाचा दबाव आणि दुसरीकडे बदलती जागतिक समीकरणे, अशा अत्यंत गुंतागुंतीच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यातील मैत्री एका नव्या आणि महत्त्वपूर्ण टप्प्यावर पोहोचली आहे. चीनमध्ये आयोजित केलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या वार्षिक शिखर परिषदेमध्ये या मैत्रीचे जुळलेले बंध सार्या जगाने याची देही याची डोळा अनुभवले.

युक्रेन युद्धानंतर रशियावर अनेक निर्बंध लादले गेले असताना भारताने राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत रशियासोबतचे संबंध केवळ टिकवले नाहीत; तर ते अधिक दृढ केले. चीनमध्ये मैत्रीचा हा नवा अध्याय केवळ दोन नेत्यांमधील वैयक्तिक केमिस्ट्रीचा नाही, तर भारताच्या परिपक्व आणि धोरणात्मक स्वायत्ततेच्या परराष्ट्र धोरणाचा स्पष्ट संदेश आहे. भारत - रशियातील मैत्रीपूर्ण संबंध हे अनेक दशकांपासून आहेत. दोन्ही देशांनी अनेक क्षेत्रांत सहकार्य केले आहे. त्यात संरक्षण, ऊर्जा, व्यापार आणि विज्ञान-तंत्रज्ञानाचा समावेश आहे. भारत आणि तत्कालीन सोव्हिएत युनियन व आताच्या रशियातील संबंधांची सुरुवात १९५० च्या दशकात झाली. सोव्हिएत युनियनने भारताच्या औद्योगिकीकरणात मोठी मदत केली. भिलाई, बोकारो आणि विशाखापट्टणम येथील स्टील प्रकल्प आणि काही वीज प्रकल्पांच्या उभारणीत सोव्हिएत युनियनने मोलाचे योगदान दिले. शीतयुद्धाच्या काळात सोव्हिएत युनियनने भारताला राजकीय आणि लष्करी मदत केली. त्यामुळे दोन्ही देशांमधील विश्वास वाढला.१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान रशियाने भारताला दिलेला पाठिंबा ऐतिहासिक मानला जातो. संरक्षण क्षेत्रातील सहकार्य भारत आणि रशियातील संबंधांचा सर्वात महत्त्वाचा धागा म्हणून इतिहासात नोंद आहे. याचे कारण म्हणजे भारताच्या लष्करी उपकरणांपैकी मोठा हिस्सा रशियन बनावटीचा होता. यावेळेपासून दोन्ही देश संयुक्तपणे लष्करी अभ्यास करत आहेत, ज्यामुळे त्यांच्यातील समन्वय वाढतोय. ब्रह्मोस क्षेपणास्त्र हा दोन्ही देशांनी एकत्रितपणे विकसित केलेला एक यशस्वी प्रकल्प आहे. तो त्यांच्या संरक्षण सहकार्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणता येईल. रशिया भारताला कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू पुरवतो. याशिवाय दोन्ही देशांनी अणुऊर्जा क्षेत्रातही मोठी भागीदारी केली.सध्याच्या जागतिक परिस्थितीत दोन्ही देशांनी त्यांच्या संबंधांना अधिक बळकटी देण्याचे उद्दिष्ट ठेवले असले तरी भविष्यात काही आव्हानेही आहेत. भारताच्या संरक्षण गरजांमध्ये विविधता येत असल्याने भारत हा अमेरिका आणि फ्रान्स यांसारख्या इतर देशांकडूनही संरक्षण साहित्य खरेदी करतोय. तरीही रशिया आजही भारताचा एक महत्त्वाचा आणि विश्वासार्ह मित्र म्हणून ओळखला जातो. दोन्ही देशांनी एकमेकांच्या सार्वभौमत्वाचा आणि राष्ट्रीय हिताचा नेहमीच आदर केला. त्यामुळे त्यांचे संबंध दीर्घकाळ टिकलेले मोदी-पुतीन यांच्या भेटीने अधोरेखित झाले.गेल्या काही दशकांपासून भारताच्या प्रगतीमध्ये रशियाने मोलाची भूमिका बजावली आहे. दोन्ही देशांमधील संबंध केवळ राजकीय किंवा व्यावसायिक नाहीत, तर ते परस्परांच्या विश्वासावर आणि ऐतिहासिक स्तरावर आधारित आहेत. अनेक आंतरराष्ट्रीय घडामोडींमध्ये भारताने रशियाच्या भूमिकेला नेहमीच सकारात्मक प्रतिसाद दिला तसा रशियानेही भारताला वेळोवेळी भक्कम पाठिंबा दिला आहे. भारतीय लष्करातील बहुतेक शस्त्रास्त्रे आणि उपकरणे ही रशियाकडून आयात केलेली आहेत. याची एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली, सुखोई एसयू-३० एमकेआय लढाऊ विमाने आणि विविध पाणबुड्या ही काही उदाहरणे आहेत.भारताच्या तेल आणि नैसर्गिक वायूच्या गरजा पूर्ण करण्यात रशियाने मोठी मदत केली. रशिया-युक्रेन युद्ध सुरू असतानाही रशियाने भारताला सवलतीच्या दरात तेलाचा पुरवठा केल्याने जागतिक मंदीच्या सावटामध्ये भारताच्या अर्थव्यवस्थेला स्थिरता आली. अणुऊर्जा क्षेत्रात तामिळनाडूमधील कुडनकुलम अणुऊर्जा प्रकल्पाच्या उभारणीत रशियाने केलेले सहकार्य हे एक मोठे उदाहरण आहे. अशा अनेक प्रकल्पांमुळे भारताच्या औद्योगिक पायाभरणीला मोठा वेग मिळाला. तसेच दोन्ही देशांमधील द्विपक्षीय व्यापार वाढवण्यासाठी विविध करार केले की, ज्यामुळे दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थेला फायदा होत आहे. एकंदरीत भारताच्या विकासातील रशियाचे योगदान हे केवळ व्यावसायिक नाही, तर ते एका जुन्या आणि विश्वासार्ह मैत्रीचे प्रतीक आहे.काश्मीर मुद्द्यावर संयुक्त राष्ट्रांत भारताच्या बाजूने वापरलेला 'नकाराधिकार' असो किंवा १९७१ च्या युद्धात दिलेला पाठिंबा असो, रशियाने नेहमीच भारताला साथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी हाच वारसा पुढे नेत त्याला आधुनिक काळाची जोड दिली. हवाई संरक्षण प्रणालीचा करार, ब्रह्मोस क्षेपणास्त्राची निर्मिती आणि अणुऊर्जा क्षेत्रातील सहकार्य हे या मैत्रीच्या भक्कम पायाचे प्रतीक आहेत. युक्रेनविरुद्ध युद्धामुळे पाश्चात्त्य देशांनी रशियावर निर्बंध लादल्यानंतर भारताने सवलतीच्या दरात रशियन कच्चे तेल खरेदी करण्यास सुरुवात केली. यामुळे भारताची ऊर्जा सुरक्षा तर जपली गेलीच; पण दोन्ही देशांमधील व्यापारही वाढला.युक्रेन युद्धावर भारताने एक संतुलित आणि स्वतंत्र भूमिका घेतली. पंतप्रधान मोदी यांनी समरकंद येथे पुतीन यांना ही युद्धाची वेळ नाही, असे जाहीरपणे सांगितले होते. यातून भारताने चर्चेतून आणि मुत्सद्देगिरीतून तोडगा काढण्याचा आग्रह धरला. पण, त्याच वेळी रशियावर टीका करणे टाळले. या भूमिकेमुळे भारताने स्वातंत्र्य जपले आणि रशियाचा विश्वासही कायम राखला. शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशन यांसारख्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर मोदी आणि पुतीन यांच्यात दिसणारा समन्वय लक्षणीयच! पाश्चात्त्य देशांच्या वर्चस्वाला पर्याय म्हणून या संघटनांना अधिक मजबूत करण्यावर दोन्ही नेत्यांचा भर आहे. केवळ शस्त्र खरेदीपुरते मर्यादित न राहता 'मेक इन इंडिया'अंतर्गत भारतात संरक्षण उपकरणांची निर्मिती आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यावर आता अधिक भर दिला जात आहे. हे सहकार्य आता खरेदीदार-विक्रेता संबंधांपलीकडे जाऊन भागीदारीच्या स्वरूपात विकसित होत आहे. मोदी-पुतीन मैत्रीचे महत्त्व भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने अनमोल आहे. पाश्चात्त्य देशांशी चांगले संबंध ठेवत असतानाच रशियासोबतची मैत्री टिकवून भारताने हे सिद्ध केले आहे की, तो कोणत्याही एका गटाचा भाग नाही.

# डाळिंबांवरील रस शोषणाऱ्या पतंगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी काय उपाय करावेत?




**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

विविध फळपिकांपैकी डाळिंब या फळांवर फळांतील रस शोषणाऱ्या पतंगांचा प्रादुर्भाव होत असतो. यामुळे फळांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. यापासून बचाव करण्यासाठी काय उपाययोजना कराव्यात हे समजून घेऊयात....

हा एक निशाचर पतंग आहे, म्हणजे तो रात्रीच्या वेळी सक्रिय असतो.

या पतंगाची रचना विशिष्ट प्रकारची असते, ज्यामुळे तो आपल्या सोंडेने पिकलेल्या डाळिंबांच्या फळांना सूक्ष्म छिद्रे पाडून आतील रस शोषतो.

हा पतंग आकर्षक असून त्याच्या मोठ्या आकारावरून आणि रंगावरून ओळखता येतो.

पिकलेली फळे निवडून त्यावर पतंग बसतात आणि फळांचे नुकसान करतात.

**अशा करा उपाययोजना**

बागेत व बागेच्या आजूबाजूला गुळवेल, वासनवेल, घाणेरी, एरंडी या यजमान वनस्पति असतील तर काढून टाकाव्यात.

बागेतील गळून पडलेली व कुजणारी फळे गोळा करून गाडून टाकावीत.

फळांतील रस शोषणाऱ्या पतंगांनी छिद्र पाडलेली फळे काढून टाकू नयेत. कारण पतंग पुन्हा त्याच फळावर बसेल व दुसरे फळ खराब करणार नाही. मात्र अशा फळांची कूज टाळण्यासाठी बुरशीनाशकाची फवारणी करावी.मर्यादित क्षेत्रावर सूर्यास्तानंतर टॉर्च व हातातील नेटच्या साह्याने फळांतील रस शोषणारे पतंग पकडून मारून टाकावेत.बागेच्या प्रत्येक कोपऱ्यावर १५०-२०० वॅट फ्लुरोसंट दिवे एकमेकांकडे तोंड करून उभारावेत.

**- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.**


शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०





# मद्यपान नकोच! जनरेशन न चा नवा फिटनेस मंत्र सोशल मीडियावर व्हायरल

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

आजची तरुण पिढी म्हणजेच मिलेनियल्स आणि जनरेशन न आता आरोग्याकडे अधिक लक्ष देऊ लागली आहे. पार्टी असो किंवा गेट-टुगेदर, आता हे लोक अल्कोहोलऐवजी नॉन-अल्कोहोलिक ड्रिंक्स किंवा लो-अल्कोहोल मॉकटेल्स पिण्याकडे जास्त कल दाखवत आहेत.

निल्सेनखटच्या एका सर्व्हेनुसार, भारतातील ३४% ग्राहक आता पूर्णपणे अल्कोहोल न पिण्याचा किंवा कमी अल्कोहोल घेण्याचा पर्याय निवडतात. हा आकडा जगातील सरासरीपेक्षा दुप्पट आहे. यातील निम्म्याहून अधिक लोक हे १८ ते ३४ वयोगटातील आहेत.

**भारतीय तरुणाईचा बदलता ट्रेड, आरोग्य प्रथम!** तरुणाई आता फिटनेस, हेल्दी आहार आणि मेंटल हेल्थवर जास्त लक्ष देते आहे. त्यामुळे मद्यपान कमी करण्याचा निर्णय घेतला जातो. यामुळे झोप नीट होते, शरीरावर वाईट परिणाम होत नाही आणि दुसऱ्या दिवशी कामात अडथळा येत नाही.

**आकडेवारी सांगते-** भारतातील ५४% लोक म्हणतात की त्यांना अल्कोहोल नको किंवा अगदी थोडे चालेल.

उत्तर भारतात हा आकडा ५४%, पश्चिम भारतात ४३% आणि दक्षिणेत ३७% आहे.

१८ ते ३४ वयोगटातील तब्बल ५३% लोकांनी मद्यपान कमी केले आहे.

५५ वर्षांवरील लोकांमध्ये हा आकडा फक्त १३% आहे.

मॉकटेल्स आणि हेल्दी ड्रिंक्सला मागणी



तरुण पिढी आता रंगीत, चविष्ट आणि हेल्दी मॉकटेल्स पसंत करते. नॉन-अल्कोहोलिक बिअर, ज्यूस बेस्ड कॉकटेल्स, फ्लेवर्ड सोडा हे नवीन पर्याय लोकप्रिय होत आहेत.

या वाढत्या मागणीमुळे अनेक कंपन्या नवीन फ्लेवर्स, झिरो अल्कोहोल बिअर, हेल्दी मॉकटेल्स मार्केटमध्ये आणत आहेत. यामुळे फूड आणि ड्रिंक इंडस्ट्रीत नवा बिझनेस निर्माण झाला आहे.

**सामाजिक फायदा**

मद्यपान कमी झाल्यामुळे आरोग्यावर वाईट परिणाम कमी होतात, अपघाताचे प्रमाण घटते आणि घरातील वातावरणही शांत राहते.

तरुणाई आता केवळ मजेसाठी नाही तर स्वतःच्या आरोग्यासाठी विचारपूर्वक निर्णय घेते आहे. मॉकटेल्स आणि नॉन-अल्कोहोलिक पेये आता पार्टीमध्ये नवा ट्रेंड बनले आहेत. भविष्यात हा ट्रेंड अजून वाढेल असे तज्ज्ञ सांगतात

# सौंदर्यदृष्टीची अभिनव चौकट

## अंबानगरी फोटो-व्हिडीओग्राफर्स असोसिएशनचे छायाचित्र प्रदर्शन

छायाचित्रण हे एक स्वतंत्र कलामाध्यम आहे. छायाचित्रकार या माध्यमातून मानवी समाज व संस्कृतीतील सर्जनशीलतेची भौतिक आणि वैचारिक अभिव्यक्ती साकारतो. रचना, प्रकाशयोजना, रंगछटा आणि क्षणनिवड या घटकांच्या साहाय्याने उत्तम व दर्जेदार प्रतिमा टिपून, वास्तवाला नवे सौंदर्य आणि अर्थ प्राप्त करून देतो. या कलेची स्वतःची दृश्यभाषा आहे; जी केवळ तांत्रिक प्रक्रीयेपुरती मर्यादित नाही, तर ती एक सौंदर्यशास्त्र आणि संवादाची व्यापक कलाभाषा आहे.

अंबानगरी फोटो-व्हिडीओग्राफर्स असोसिएशनच्या वतीने स्थानिक श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनाच्या कला दालनात राज्यस्तरीय छायाचित्र प्रदर्शन भरविण्यात आले आहे. हे प्रदर्शन नेचर अँण्ड वेडींग या दोन विषयात विभागले आहे. या प्रदर्शनात २०० हून अधिक छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली असून, हे प्रदर्शन २१ सप्टेंबर पर्यंत खुले राहणार आहे.

निसर्गवैभव:निसर्ग छायाचित्रण म्हणजे केवळ कॅमेरात दृश्य टिपणे नव्हे, तर निसर्गातील सौंदर्याचा आत्मानुभव प्रकट करण्याची एक कला आहे. त्यासाठी निसर्गाला जवळून अनुभवावे लागते. निसर्गाची विविध ऋतूतील विलोभनीय रुपे, आश्चर्यचकित करणारी ठिकाणे, डोंगरदऱ्या, धबधबे, वेगवान वाहणाऱ्या नद्या, घाटवाटा, विस्तीर्ण शुष्क पानझडी वने, घनदाट, मिश्र व सदाहरित वनांनी व्यापलेला विदर्भ प्रदेश, दवबिंदूंची नाजूक चमक, वाऱ्यावर डुलणारे गवत, फुलांवर थिरकणारी फुलपाखरे, सुर्योदय व सुर्यास्ताची मनमोहक अदा, निळ्याशार क्षितिजाचे नयनरम्य दृश्य, दुरच्या देशांतील रोमांचकारी निसर्गसौंदर्य, पशू-पक्षांचे विश्व यासारख्या विविध विषयांवरची सर्वांग सुंदर छायाचित्रे या प्रदर्शनात पहावयास मिळतात.

ड्रोन कॅमेराद्वारे टिपलेला गर्द हिरवा डोंगराळ भूप्रदेश, पर्वतरांगांमध्ये वसलेल्या निवासी क्षेत्राला पांढऱ्या शुभ्र ढगांच्या चादरीने वेढलेले दृश्य छायाचित्रण कलेचा अच्युत्त नमूना आहे. त्या प्रतिमांतील विस्तार, एकाग्रता, त्रिमितीदर्शन आणि कम्पोझिशन या सर्व बाबी सुखावणार्या आहेत. नैसर्गिक छायाप्रकाशातील सूक्ष्म भेदाने निसर्गातील विविध घटकांची वीण, जुळणी, पोत स्पष्ट करुन त्या घटकांच्या प्रकृतीची जाण करुन दिली आहे. हिरवाईने नटलेला शांत, लोभस तर कधी रौद्ररुप धारण केलेल्या निसर्गातील एकमेकांत कळत नकळत मिसळलेले आकार, सूक्ष्म छटाभेद व तपशिलांतील बारकावे छायाचित्रकारांनी अचूक टिपले आहेत.



वन्यजीव: वन्यजीव छायाचित्रणाचे तंत्र फार वेगळे आहे. प्राण्यांना त्यांचा नैसर्गिक अधिवासात पकडून, छायाचित्रण करणे अत्यंत कठीण असते. त्यासाठी जिद्द, संयम आणि सर्जनशीलता लागते. योग्य क्षण टिपण्यासाठी तासन् तास वाट पाहावी लागते. या प्रदर्शनात सहभागी झालेल्या छायाचित्रकारांनी देखील प्राणी जीवनातील प्रेम भवना, पशु-पक्ष्यातील वात्सल्य कलात्मकतेने टिपले आहे.

'वाईल्डबीस्ट' या जंगली प्राण्याची शिकार करण्यासाठी चित्त्यांनी केलेली एक नाट्यमय युती, उडणारा मोर आणि त्याच्या गतीमान हालचालीचा क्षण, मासेमारीच्या जाळ्यात पक्षाला अडकवण्याचे दृश्य, दोन घरमाश्यातील प्रणय, भारतीय शैलीतील हस्तनिर्मित बैलगाडी, गुढी आणि खार, दोन काळ्या डोक्याचे गुल (क्रोइकोसेफलस रिडिबंडस), उबदार, नारिंगी रंगाच्या पार्श्वभूमीवर झाडाच्या फांदीवरील सरडा यासारख्या वन्यजीवांच्या हालचालींचे बारकाईने निरिक्षण करुन, छायाचित्रात नैसर्गिक घटकांचा अतिशय सुचक उपयोग केला आहे. त्या सर्व प्रतिमांच्या रचनेतील चौकट, अवकाश विभाजन, प्रकाश स्त्रोत लक्ष वेधून घेतात. सिंह आणि सिंहीण यांच्यातील प्रणय, वाघाची भेदक नजर, रुबाबदार वनराज, चित्ता-बछड्यांचा खेळ, जंगली श्वापदावर चित्त्यांचा प्रहार, बिबट, हत्ती, माकड या वन्यजीवांच्या छायाचित्रातील सौंदर्यमुल्य प्रभावी आहे. निसर्गात वास्तव्य करणाऱ्या प्राण्यांबद्दल कुतूहल आणि कौतुकाची भावना जागृत करणारी छायाचित्रे नजरा खिळवून ठेवतात.

विवाह समारंभ:विवाह हा मनुष्याच्या आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा आहे, जो सामाजिक, भावनिक आणि धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचा मानला जातो. विवाह समारंभ नातेसंबंध आणि कुटुंबांना जवळ आणतात. आजच्या डिजिटल युगात विवाह समारंभाचे छायाचित्रण ही एक स्वतंत्र कलाशैली बनली आहे. समारंभातील आनंददायी क्षण, आठवणी दृश्यस्वरुपात कायमस्वरुपी जतन करुन ठेवण्यासाठी, विवाह छायाचित्रणाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

विवाह समारंभातील पारंपरिक छायाचित्रांसोबतच कँडिड (नैसर्गिक) फोटोग्राफी, प्री-वेडिंग फोटोग्राफी, साखरपुडा, हळद, मेहंदी समारंभ आणि प्रसंगानुरुप लग्नाच्या दिवसातील आनंदाचे क्षण छायाचित्रकारांनी कलात्मक दृष्टी व तांत्रिक कौशल्याचा पुरेपूर वापर करुन टिपली आहेत. ती अतिशय बोलकी आणि सर्वांगसुंदर आहेत. केळवणातील आनंददायी संवाद, विशेषतः विवाहदिनीच्या चमकदार रांगोळ्या, रंगीबेरंगी तोरण, सजावट, पारंपरिक पोशाखातील वधू-वराचा प्रवेश, मंगलाष्टकादरम्यान वधू-वराच्या चेहऱ्यावरील स्मित हास्य, वधूच्या दागिन्यांमधील बारकावे, अंगठी, वरमाला परिधान, सप्तपदी, नवरीला निरोप देतानांचा कुटुंबासोबतचा भावनिक प्रसंग अतिशय सुरेखतेने टिपला आहे.

जहाजावरील भव्य दिव्य शाही विवाह सोहळा, आकाशात रंगीबेरंगी धुराच्या वाटांचे कोरिओग्राफ केलेले प्रदर्शन, पार्श्वभूमीत सजवलेले आकर्षक स्टेज आणि एकंदरीत समारंभाचा मुड पकडून, टिपलेले छायाचित्र अप्रतिम आहे. पारंपरिक भारतीय विवाहसोहळ्यातील वेशभूषा आणि दागिन्यांमधील टिपलेला जोडप्याचा सुंदर क्लोज-अप आनंद, कोमलता आणि बंधाचा क्षण सूचित करणारा आहे, तर लग्नापूर्वीच्या विधीतील टिपलेल्या हळदीच्या सोहळ्याची छायाचित्रे तंत्र आणि सौंदर्यदृष्ट्या परिपूर्ण आहेत.या प्रदर्शनात सहभागी झालेल्या छायाचित्रकारांमध्ये कलाकृतीत अभिनव आशय निर्माण करणारी स्वतंत्र कलादृष्टी आहे. पारंपारिक सौंदर्यशास्त्र आणि समकालीन संवेदनशीलता यांचे मिश्रण करण्याची क्षमता आहे. यानिमित्ताने नवोदित, हौशी आणि व्यावसायिक छायाचित्रकारांच्या कला जीवनाला अविष्कृत करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.



**आशीष यावले**
नागपूरमो.९९२२२९००२२
(लेखक उपयोजित कलेचे अभ्यासक आहेत.)

# श्रवण यंत्र विकसित करणाऱ्या सरक्युटो क्लारो सोल्युशन कंपनीचा विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरमध्ये समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती १२-** श्रवण यंत्र विकसित करणाऱ्या सरक्युटो क्लारो सोल्युशन प्रा. लि. या कंपनीचा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाउंडेशन अंतर्गत कार्यरत इन्क्युबेशन सेंटरमध्ये समावेश करण्यात आला आहे. सदर कंपनी स्टार्टअप्स आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन, तांत्रिक सहाय्य, पेटंट प्रक्रिया, निधी सहाय्य, नेटवर्किंग संधी, को-वर्किंग स्पेस अशा नाविन्यपूर्ण कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविणार आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड तसेच




ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिपक धोटे यांचे यासाठी मोलाचे मार्गदर्शन लाभले. यावेळी इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर, तर कंपनीच्यावतीने संचालक श्री वेदांत भेंडकर, श्री अभिषेक मोडक उपस्थित होते. सरक्युटो क्लारो सोल्युशन प्रा. लि. ही कंपनी श्रवणदोष असलेल्या व्यक्तींसाठी बोनलिंक नावाचे उपकरण विकसित करीत आहे. सदर उपकरण हाडांच्या वहन तंत्रज्ञानावर आधारित असून, कवटीतील हाडांद्वारे ध्वनीकंपन थेट आतील कानात पोहोचवते. परिणामी, हे उपकरण कानाच्या पडद्याची आवश्यकता न ठेवता ध्वनी प्रसारित करते, त्यामुळे विशिष्ट प्रकारचा श्रवणदोष असलेल्या व्यक्तींना स्पष्ट आवाज ऐकू येतो आणि संवाद अधिक सुलभ होतो. सदर उपकरण श्री मंगेश भारती आणि श्री अक्षय कावळे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आले आहे. त्यांची सर्जनशीलता व तांत्रिक कौशल्य या स्टार्टअपसाठी आधारस्तंभ ठरली आहेत. संचालक डॉ. स्वाती शेरेकर यांच्या पुढाकाराबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २० सप्टेंबर २०२५

शहर/ग्रामिण


# प्रधानमंत्री आवास योजनेच्या बांधकामाची मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती-** अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी नवसारी येथील २ साईट वरील व रहाटगाव येथील १९९, १२७, ११६ या तीन साईट वरील प्रधानमंत्री आवास योजनेच्या (झच-ध) बांधकाम स्थळाची पाहणी करून प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला.



या पाहणीदरम्यान आयुक्तांनी सुरू असलेल्या इमारतींची बांधकामाची गुणवत्ता, साहित्याचा वापर, कामाचा वेग तसेच नियोजनाची सविस्तर माहिती संबंधित अभियंते व कंत्राटदारांकडून जाणून घेतली. प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी अडथळे दूर करण्यावर भर देत त्यांनी ठरलेल्या मुदतीत लाभार्थ्यांना घरे मिळावीत यासाठी काटेकोर नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी सांगितले की, प्रधानमंत्री आवास योजना ही शहरातील गरजू, गरीब व निम्नआय गटातील कुटुंबांना स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी एक महत्त्वाची योजना आहे. शासन व महानगरपालिकेच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हजारो कुटुंबांना सन्मानाचे निवासस्थान उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बांधकामाच्या गुणवत्तेशी तडजोड न करता वेळेत काम पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

बांधकामाच्या टप्प्यानुसार इमारतींच्या प्रगतीची माहिती घेताना आयुक्तांनी प्रकल्प परिसरातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा व स्वच्छतासुविधा यांचीही तपासणी केली. रहिवाशांना राहण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला.

प्रधानमंत्री आवास योजनेतर्गत उभारल्या जाणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पामुळे शहरातील असंख्य कुटुंबांना स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार असून ही योजना सामाजिक व आर्थिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी आयुक्तांनी परिसरातील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. सदर नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे निर्देश संबंधीत अधिका-यांना दिले.

नवसारी व रहाटगाव येथील प्रधानमंत्री आवास योजनेच्या बांधकाम पाहणीदरम्यान आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निर्देश की, कामाची गुणवत्ता सर्वोच्च ठेवावी. बांधकामामध्ये दर्जेदार साहित्याचा वापर करून कुठलाही निकृष्ट दर्जाचा वापर होऊ नये. निर्धारित मुदतीत प्रकल्प पूर्ण करावा. लाभार्थ्यांना वेळेत घरे मिळावीत यासाठी कामकाज गतीने व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडावे. नियमित आढावा घ्यावा. संबंधित अभियंते व कंत्राटदारांनी दर आठवड्याला प्रगती अहवाल सादर करावा. पायाभूत सुविधा प्राधान्याने उपलब्ध कराव्यात. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छतासुविधा यावर विशेष लक्ष केंद्रित करावे. लाभार्थ्यांचा विश्वास अबाधित ठेवावा. ही घरे गरजू व निम्नआय वर्गीय कुटुंबांची स्वप्ने पूर्ण करणारी आहेत, त्यामुळे प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित व दर्जेदार घर मिळाले पाहिजे.

या पाहणीवेळी महानगरपालिकेचे संबंधित विभाग प्रमुख शहर अभियंता रविंद्र पवार, प्रधानमंत्री आवास योजनेचे उपअभियंता लक्ष्मण पावडे, अभियंते, कंत्राटदार व प्रकल्पाशी निगडित अधिकारी उपस्थित होते. अधिकारी व कंत्राटदारांना नियमितपणे कामकाजाचा आढावा घेऊन प्रगती अहवाल सादर करण्याचेही निर्देश आयुक्तांनी दिले.

# घटस्थापनेचा मुहूर्त काय

## जाणून घ्या देवीची विधीवत पूजा कशी करावी..!




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**
महिषासुर राक्षसाचा वध करुन देवी दुर्गाने वाईटावर विजय मिळवला होता. याच कारणास्तव देवी दुर्गाला वंदन करून देवीच्या नवदुर्गा रूपांची पूजा नवरात्रीत केली जाते. स्त्रीशक्तीचा जागर करणारा उत्सव म्हणून नवरात्रोत्सवाकडे पाहिले जाते. याकाळात स्त्रीशक्तीला मान दिला जातो. नवरात्रीत प्रत्येक दिवशी देवीची नऊ रुपे पुजली जातात. नवरात्र उत्सवाच्या पहिल्या दिवशी घटस्थापना केली जाते. हे घट नऊ दिवस आपल्या घरात बसवले जातात व दसऱ्याच्या दिवशी घटाचे विसर्जन करण्यात येते. यंदा नवरात्र उत्सव केव्हा आहे. घटस्थापनेचा मुहूर्त नक्की कोणता व देवीची विधिवत पूजा कोणत्या शुभ वेळेत करावी यासर्व गोष्टी आज आपण जाणून घेऊयात.

नवरात्रौत्सव २०२५ तारीख

नवरात्रोत्सव दरवर्षी आश्विन शुद्ध प्रतिपदेला सुरु होतो व आश्विन शुद्ध नवमीला तो समाप्त होतो.

यंदा नवरात्रौत्सव २२ सप्टेंबरपासून सुरु होणार आहे. याच दिवशी घटस्थापना केली जाईल.

नवरात्र उत्सव समाप्ती ३० सप्टेंबरला नवमी असून यंदा १ ऑक्टोबरला महानवमी आहे.

महानवमी १ ऑक्टोबरला असल्याने यंदा हा उत्सव दहाव्या दिवशी संपेल.

### घटस्थापनेचा शुभ मुहूर्त

सोमवार २२ सप्टेंबर २०२५

सकाळी : ६.०९ वाजेपासून ते सकाळी ८.०६ वाजेपर्यंत

अभिजित मुहूर्त : सकाळी ११.४९ वाजेपासून ते दुपारी १२.३८ वाजेपर्यंत

याकाळात तुम्ही घटस्थापना करू शकता.

### घटस्थापना व देवीची पूजाविधी

नवरात्रोत्सव २२ सप्टेंबरला सुरु होणार असून याच दिवशी घटस्थापना देखील शुभ मुहूर्तावर केली जाईल. नवरात्रीत देवीचे घट बसवण्याला महत्व आहे. अनेकजण आपापल्या पद्धतीने हे घट बसवतात. मात्र अनेकठिकाणी देवीच्या पुढे परडी ठेवून त्यात माती टाकली जाते व मातीत धान्य पेरले जाते. त्यातच एक कलश मांडून कलशात नारळ व विड्याची पाने ठेवली जातात. त्या कलशाला रोज पानांची व फुलांची माळ प्रत्येक दिवशी बांधली जाते. या घटाची देवीपुढे नियमित नऊ दिवस पूजा करण्यात येते. घटस्थापना करून देवीची देखील विधिवत पूजा करावी. याकाळात आपल्या देवघरात अखंड ज्योतीचा दिवा लावावा. व पुढील नऊ दिवस देवीची सकाळ संध्याकाळ आरती करुन व नैवेद्य दाखवून पूजा करावी.

# सुसुत्रता, पारदर्शकता आणण्यासाठी महसूल परिषद महत्वपूर्ण ठरणार

## सहभागी अधिकाऱ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण, महसूल परिषद उत्साहात सपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती,**
प्रशासकीय कामकाज अधिक सुलभरित्या होण्यासाठी, तसेच कामकाजात ससुत्रता व पारदर्शकता आणण्यासाठी महसूल परिषद महत्वपूर्ण ठरणार आहे, असे मत परिषदेत सहभागी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी व्यक्त केले. महसूल अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनासाठी एक दिवसीय महसूल परिषदेचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले. दोन सत्रात आयोजित करण्यात आलेल्या या महसूल परिषदेत महसूल विभागाशी संबंधीत असलेल्या प्रमुख विषयांवर तज्ज्ञ महसूल अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

या परिषदेत प्रथम सत्रात सह आयुक्त किरण पाणबुडे यांनी भूसंपादन व पुनर्वसन कायदा यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. भूसंपादन व पुनर्वसन कायदा अंतर्गत असलेल्या जमीन अधिग्रहण, संयुक्त मोजणी महत्वाचे टप्पे आहेत. भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करताना प्रस्तावासोबत ७/१२ उतारे व ड्रोनव्दारे घेण्यात आलेली छायाचित्रे सादर करावीत. संयुक्त मोजणी ही भूधारक व मोजणीशी संबंधित सर्व प्रशासकीय अधिकारी उपस्थितीत करण्यात यावी. तसेच भूसंपादन कायद्यातील कलम १९ खाली अधिसूचित करावयाचे क्षेत्र हे कलम ११ मध्ये अधिसूचित क्षेत्रापेक्षा अधिक असता कामा नये. जमीनीचे बाजारमुल्य निश्चित करताना मूळ दस्त मागवून कलम २८ नुसार नुकसानीचे मापदंड विचारात घ्यावे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.



बुलडाणाचे जिल्हाधिकारी यांनी १५० दिवसांच्या कृती आराखडा अंतर्गत 'ई-गव्हर्नन्स सुधारणा व नाविण्यपूर्ण उपक्रम' या विषयावर मार्गदर्शन केले. ई-गव्हर्नन्स सुधारणा अंतर्गत विविध दस्ताऐवजांचे डिजीटलायझेशन व संगणीकृत दस्तऐवज उपलब्धतेसाठी महसूल प्रशासनाव्दारे 'सहज प्रणाली' विकसित करण्यात आली आहे. ई गव्हर्नन्स अंतर्गत सुलभ सेवा चॅटबॉट विकसित करण्यात आले असून याव्दारे महसूल विभागाशी संबंधीत विविधसेवा, योजनांचा लाभ कसा घ्यावा यासंदर्भात व्हाटसप माहिती उपलब्ध दिल्या जात आहे. या सर्व प्रकल्पांमुळे प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता आणि वेळ वाचून गतीमानता आली आहे. ही प्रणाली इतर जिल्ह्यांनी उपयोगात आणावी, असे आवाहन त्यांनी केले.

अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी 'पाणंद रस्त्यांसंबंधी महसूली प्रक्रिये'बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. पाणंद रस्त्यांबाबत सुसुत्रता येण्यासाठी अस्तित्वात असलेल्या नकाशावरील नोंदी लक्षात घेवून अतिक्रमीत रस्ते, शेत रस्ते याबाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

'जीपीएस व एआय आधारित स्मार्ट अटेंडन्स व ॲक्टिविटी मॅनेजमेंट सिस्टिम' या विषयावर यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी कार्यालयात हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत असून त्याव्दारे कर्मचाऱ्यांची उपस्थिती तसेच ग्रामीण भागातील नोंदवही पगार प्रक्रियेसाठी खूप उपयोगी ठरली असून त्यामुळे अहवालात अचूकता आली आहे.

'रोखवही हाताळताना घ्यावयाची काळजी' या विषयावर सहाय्यक संचालक (ताळमेळ) संतोष कंदेवार यांनी मार्गदर्शन केले. प्रत्येक शासकीय कार्यालयासाठी रोखवही हा अत्यंत महत्वाचा दस्तऐवज असून प्रत्यक आर्थिक व्यवहाराच्या जमा व खर्चाच्या नोंदी त्यात नोंदविल्या जातात. प्रत्येक आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी महिना अखेरीस रोखवही नोंदवही तपासून त्यातील अखेरची शिल्लक व बँक खात्यातील शिल्लक तपासावी. महिना अखेरीस बँकेतील शिल्लक असणारी रक्कम ही रोखवहीतील शिल्लक रकमेपेक्षा कमी असता कामा नये, अशी माहिती त्यांनी दिली.

शासकीय जमिनीचे वाटपासंदर्भात महसूल उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांनी मार्गदर्शन केले. शासकीय जमिन वाटप करताना कायदा आणि त्या अनुषंगाने झालेल्या शासन निर्णयांचा विचार होणे आवश्यक आहे. तसेच जमिन वितरणाचा प्रस्ताव रितसर करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक ती कागदपत्रे असल्याची खातरजमा करण्यात यावी. गायरान जमिन देण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय महत्वाचा आहे. सध्या पट्टेवाटप हा महत्वाचा विषय असून त्यासाठी असलेल्या शासन निर्णयांचा आधार घेऊन पट्टेवाटपाची प्रक्रिया करण्याचे श्री. जाधव यांनी सांगितले.

विभागीय चौकशीबाबत प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी विठ्ठल इनामदार यांनी मार्गदर्शन केले. विभागीय चौकशीचे प्रकरण सादर करताना तो परिपूर्ण सादर करण्यावर भर द्यावा. चौकशी प्रस्तावित करीत असताना केलेले आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी सादरकर्ता अधिकारी यांच्यावर असल्याने प्रस्तावासोबत प्रत्येक पुरावा जोडलेला असावा. चौकशी प्रकरणात बचाव पक्षाला पूर्ण संधी देणे आवश्यक आहे. प्रकरणातील साक्षीदारांचे संपर्क क्रमांक आणि पत्ता नमूद करणे आवश्यक आहे. तसेच साक्ष आणि पुराव्यांची उलट तपासणी करण्याची मुभा आहे. आरोप सिद्ध करण्यात कसूर केल्यास सादरकर्ता अधिकारी यांच्यावर कार्यवाही प्रस्तावित होऊ शकत असल्याचे त्यांनी सांगितले.

अर्धन्यायिक प्रकरणांबाबत अपर आयुक्त सुरज वाघमारे आणि उपायुक्त किरण पाणबुडे यांनी मार्गदर्शन केले. श्री. पाणबुडे यांनी न्यायिक आणि प्रशासकीय बाबींच्या मधील प्रकरणे ही अर्धन्यायिक स्वरूपाची असतात. त्यामुळे अत्यंत काळजीपूर्वक ही प्रकरणे हाताळावी लागतात. तसेच दिवाणी कायद्यांचा आधार घेणे नमूद असल्यास त्यांचा उपयोग करून घेता येतो. प्रकरणांमध्ये नैसर्गिक न्यायाचा नियम असल्याने यात पक्षपाती नसणे अपेक्षित आहे. तसेच निर्णयाचे पुनर्विलोकन आणि पुनरिक्षण होते. त्यामुळे योग्य आदेश पारित करण्याची जबाबदारी असते. आदेश पारित करीत असताना त्यामध्ये भूमिकेचे सातत्य असणे गरजेचे असल्याचे सांगितले.

श्री. वाघमारे यांनी अर्धन्यायिक प्रकरणात वस्तुस्थितीदर्शकतेच्या अनुषंगाने आदेश होणे आवश्यक आहे. त्यामुळे कार्यप्रणालीवर आरोप होता कामा नये, तसेच चुकीचे दंडात्मक आदेश रद्द होत असल्याने कार्यवाही करताना काळजी घ्यावी. निर्णय योग्य पद्धतीने झाल्यास ते पुढील स्तरावरही कायम राहतील, यासाठी सर्व प्रक्रिया योग्य पद्धतीने करावी. निकालपत्रामध्ये सर्व बाबींचे निरीक्षण नोंदविणेही महत्वाचे असल्याचे सांगितले.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या हस्ते सर्व जिल्हाधिकारी यांना स्मृतिचिन्ह आणि सहभागींचे प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच मान्यवरांनी विभागीय आयुक्त कार्यालयात वृक्षारोपण केले.

# मनपा प्रभाग रचना प्रारूपाच्या १३४ हरकतींवरची सुनावणी पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**-महानगर पालिका सावात्रक निवडणूक प्रभाग रचना प्रारूपसंदर्भात १६ ते १९ सप्टेंबर या चार दिवसांदरम्यान १३४ आक्षेपावर सुनावणी आटोपली आहे. उर्वरित ४४ आक्षेपांवर सोमवार, २२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी आशिष येरेकर हे सुनावणी घेणार असून, त्यानुसार आक्षेपकर्त्यांना बोलावण्यात आले आहे. आतापर्यंत प्रभाग रचना प्रारूपाच्या आक्षेप/हरकतींवर सुनावणी जिल्हाधिकारी कार्यालयातील कक्षात घेण्यात आल्या आहेत.अमरावती महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर केलेल्या प्रभाग रचना प्रारूपसंदर्भात १५ सप्टेंबरपर्यंत १३४ जणांनी हरकती नोंदविल्या होत्या. या आक्षेपांवर राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार १६ ते २२ सप्टेंबरदरम्यान जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांना सुनावणी घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आतापर्यंत १३४ हरकतींवर सुनावणी घेण्यात आल्या.



### सर्वाधिक आक्षेप प्रभाग रचनेवर-

प्रभाग रचना प्रारूपसंदर्भात १३४ जणांनी आक्षेप घेतला आहे. यात सीमांकनात बदल, व्याप्तीमध्ये नावे गहाळ, प्रभागाच्या नावात बदल, २०१७ नुसारच प्रभागाची रचना असावी, महापालिका प्रशासनाने तयार केलेली प्रभाग रचना प्रारूप हे अतिशय चांगले असून, प्रशासनाचे अभिनंदन करण्यात आले आहे. माजी महापौर मिलिंद चिमोटे यांनी १८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी येरेकर यांच्यासमक्ष हरकतींवर बाजू मांडताना श्रीकृष्ण पेठ आणि अशोकनगर या प्रभागाच्या विभागणीवर बोट ठेवले.

### मंगळवारी नगरविकासकडे अहवाल पाठविणार

अमरावती महापालिका निवडणुकीसाठी २२ प्रभागांची रचना तशीच ठेवून नवीन प्रारूप ऑगस्ट महिन्यात प्रशासनाकडून तयार करण्यात आले होते. आता २२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी हे आक्षेपावर सुनावणी घेतील. त्यानंतर अंतिम प्रभाग रचनेचे अहवाल २३ सप्टेंबर रोजी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठविला जाणार आहे. त्यानंतर निवडणूक प्रक्रिया सुरू होईल.

# अमरावती महानगरपालिकेचे अधिकृत Whats-pp चॅनल सुरू - नागरिकांना मिळणार थेट मोबाईलवर अपडेट्स

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती-** नागरिकांपर्यंत महत्त्वाची माहिती, जनहिताचे आदेश तसेच विविध उपक्रमांची माहिती वेळेवर पोहोचविण्यासाठी अमरावती महानगरपालिकेच्या वतीने अधिकृत थहरीं-ि चॅनल सुरू करण्यात आले आहे.या चॅनलच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या महत्त्वाच्या सूचना, आदेश, कार्यक्रमांची माहिती, उपक्रम व नागरिकांसाठी आवश्यक असलेले अपडेट्स थेट त्यांच्या मोबाईलवर उपलब्ध होणार आहेत.महानगरपालिकेकडून देण्यात आलेल्या आवाहनात म्हटले आहे की, अमरावती महानगरपालिकेच्या सर्व अपडेट्स, बातम्या व नोटिसेस आता थेट थहरीं-ि वर उपलब्ध राहणार आहेत. नागरिकांनी या अधिकृत थहरीं-ि चॅनलला जोडून वेळोवेळी अधिकृत माहिती मिळवावी.




यामुळे पारदर्शकता वाढून नागरिकांना आवश्यक माहिती सहज आणि त्वरित मिळणार आहे.अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले की, अमरावती महानगरपालिकेच्या अधिकृत थहरीं-ि चॅनलला नागरिकांनी सबस्क्राईब करावे. या माध्यमातून महानगरपालिकेच्या सर्व महत्त्वाच्या सूचना, आदेश व उपक्रमांची माहिती थेट मोबाईलवर मिळेल. अधिकृत माहिती वेळोवेळी जाणून घेण्यासाठी सर्वांनी या चॅनलचा लाभ घ्यावा. Follow the -mravati Municipal Corporation channel on Whats-pp: https://whatsapp.com/channel/0029Vb6hBPL05MUiNbV7pf1o

# दर्यापूर तालुका ओला दुष्काळ जाहीर करून तात्काळ मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करा

## शिवसेना उबाठा महिला आघाडी चे तहसीलदार यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०दर्यापूर –**

माहे जून ते माहे सप्टेंबर मध्यापर्यंत दर्यापूर तालुक्यात पाऊस भरपूर प्रमाणात झाला असल्याने तूर,सोयाबीन आणि कपाशी या पिकावर त्याचा विपरीत परिणाम होऊन जवळपास पिके ही नष्ट झालेली आहेत शेतकरी हवालदिल झाल्या असल्याने त्याची आर्थिक परिस्थिती बिकट होत आहे अशा परिस्थितीत जेवढे पाऊस पाहिजे त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रमाणात पाऊस झाला असल्याने शेतकऱ्यांच्या सोयीसाठी व जगाच्या पोशिंदाच्या सहकार्यासाठी ओला दुष्काळ जाहीर होणे अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ अलका निलेश पारडे यांच्या हस्ते उपतालुका प्रमुख अर्चनाताई पखाले,उपशहर प्रमुख सुनीता मांडवे,उपशहर




प्रमुख मनीषा कडू ,शिवसेना शहर प्रमुख गोपाल अग्रवाल, उपशहर प्रमुख दीपक बगाडे महिला शिवसैनिक पूजा रामावत यांच्या प्रमुख उपस्थितीत निवेदन तहसीलदार दर्यापूर यांच्या अनुपस्थितीत नायब तहसीलदार जमदाडे यांच्या मार्फत मा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले त्यावर जमदाडे यांनी सांगितले की पंचनामे सुरू आहे व नागपूर येथून साटेलाइट सर्वे होणार असून जो शासन आदेश देईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.शिवसेना महिला आघाडी यांनी निवेदन सादर करतेवेळी मुख्यमंत्र्यांनी कोणतीही जाचक अटी न लावता दर्यापूर तालुका हा ओला दुष्काळ म्हणून घोषित करावा व आर्थिक मदत तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली निवेदन सादर करते वेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ अलका निलेश पारडे, शिवसेना शहर प्रमुख गोपाल अग्रवाल, उपतालुका प्रमुख अर्चनाताई पखाले, उपशहर प्रमुख सुनीता मांडवे, उपशहर प्रमुख दीपक बगाडे, महिला शिवसैनिक पूजा रामावत , उपशाखा प्रमुख मनिषा कडू, संजीवनी नेमावत, मंदा कडू, ज्ञानेश्वरी वानखडे, प्रतिभा गव्हाळ,अमोल ढेगेकर, निलेश पारडे इत्यादी उपस्थित होते.

# नागपूर ग्रामीण जिल्ह्यासाठी काँग्रेसच्या प्रभारींची नियुक्ती

## संघटन बळकटीसाठी बैठकींचे नियोजन

### जिल्हा प्रभारी म्हणून विरेंद्र जगताप तर हरिभाऊ मोहड यांना उमरेड ची जवाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष मा. हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून नागपूर जिल्हा (ग्रामीण) काँग्रेस कमिटीसाठी नवीन जिल्हा व विधानसभा प्रभारींची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनात्मक कार्य अधिक प्रभावी व गतिमान करण्याच्या उद्देशाने ही पावले उचलण्यात आली आहेत.





जिल्हा प्रभारी म्हणून विरेंद्र जगताप , उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी यांची नियुक्ती झाली आहे.तरहरिभाऊ मोहड यांच्या कडे उमरेड ची जवाबदारी द ण य ा त आलीत्याचप्रमाणे, नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील सहा वि ध ा न स भ ा मतदारसंघांसाठी विधानसभा प्रभारी नियुक्त करण्यात आले आहेत:या नियुक्तीनंतर जिल्हा प्रभारी व विधानसभा प्रभारींच्या उपस्थितीत तातडीने बैठकांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या बैठकीसाठी जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते, ब्लॉक अध्यक्ष, प्रदेश व जिल्हा पातळीवरील प्रमुख पदाधिकारी यांना आमंत्रित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.पक्षाने आपल्यावर जी जवाबदारी दिली आहे ती आपण प्रामाणिक पणे पार पाडू पक्ष संघटन अधिक मजबूत कसे होईल या वर लक्ष देणार असल्याचे यावेळी काँग्रेस सरचिटणीस हरिभाऊ मोहड यांनी सांगितले.

# प्रधानमंत्री स्वनिधी लोककल्याण मेळावा यशस्वीरीत्या संपन्न – छोट्या विक्रेत्यांना दिलासा

*विदर्भ प्रजासत्ताक*
***दि.२० अमरावती :***

*प्रधानमंत्री स्ट्रीट व्हेंडर्स आत्मनिर्भर निधी (झच् डथ–छळवहळ) योजनेअंतर्गत अमरावती महानगरपालिका, झोन क्र. २ राजापेठतर्फे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत प्रधानमंत्री स्वनिधी लोककल्याण मेळावा आयोजित करण्यात आला. मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त योगेश पिठे यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन झाले.या योजनेअंतर्गत फेरीवाले, हातगाडीवाले, फळ–भाजी विक्रेते, चहा विक्रेते आदी लघु व्यवसायिकांना व्यवसायासाठी रु.१५ हजारांपर्यंत कर्जाची सुविधा मिळते. वेळेत परतफेड केल्यास पुढील टप्प्यात २५ हजार व ५० हजारांपर्यंतचे कर्ज उपलब्ध होते.मेळाव्यात ऑन–द–स्पॉट नोंदणी, एसबीआय व बँक ऑफ बडोदामार्फत कर्ज वितरण, णझख–टठ कोड व्यवहारांचे प्रशिक्षण, डिजिटल व्यवहार करणाऱ्या विक्रेत्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच मुद्रा योजना, आयुष्मान भारत, उद्यम आधार आदी योजनांची माहितीही देण्यात आली. या उपक्रमामुळे छोट्या विक्रेत्यांना आर्थिक सक्षमीकरणाचा मोठा आधार मिळाला.*

# सुरक्षित आणि अधीकृत वीज जोडणी घेवूनच साजरा करा दुर्गोत्सव– महावितरण

## महावितरणकडून तातडीने तात्पूरता वीज जोडणीची व्यवस्था

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती,**

सोमवार पासून दुर्गोत्सवाला सुरूवात होत आहे. उत्सव काळात भक्तिभावाने उत्सहात सहभागी होत असलेल्या लाखो भाविकांच्या सुरक्षिततेसाठी दुर्गोत्सव मंडळांनी अधीकृत वीज जोडणी घेवूनच उत्सव साजरा करावा असे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.महावितरणने सार्वजनिक उत्सव मंडळांसाठी तात्पुरती वीज जोडणी देण्याची व्यवस्था केली असून केवळ घरगुती दरात वीज जोडणी देण्यात येते.

उत्सवातील रोषणाई, आकर्षक देखावे, मंडप, महाप्रसाद आणि इतर कार्यक्रमांसाठी लागणारी वीज व्यवस्था फक्त अधिकृत वीज कंत्राटदारांकडूनच करून घेतली पाहिजे. बेकायदेशीर आणि अनधिकृत वीज जोडण्यांमुळे शॉर्ट सर्किट किंवा इतर गंभीर अपघात होण्याचा धोका असतो. म्हणूनच, सुरक्षेशी कोणतीही तडजोड न करता अर्ज करताच मंडळांना तात्पुरती वीज जोडणी दिली जाईल. असे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

अशी घ्या काळजी: मंडपातील विजेचे वायरिंग अत्यंत व्यवस्थित आणि प्रमाणित असावे. मीटर केबिनमध्ये जाण्याची परवानगी केवळ अधिकृत आणि प्रशिक्षित व्यक्तीलाच द्या. वीज जोडण्यांसाठी नेहमी दर्जेदार वायर आणि स्विच वापरा. आपत्कालीन परिस्थितीत संपूर्ण मंडपाचा वीजपुरवठा एकाच स्विचने खंडित करण्याची सोय असावी. तुटलेल्या वायर जोडण्यासाठी केवळ दर्जेदार इन्सुलेशन टेपचाच वापर करा. मीटर आणि स्विच जवळचा रस्ता नेहमी मोकळा ठेवावा, जेणेकरून गरज पडल्यास




त्वरित पोहोचता येईल. मंजूर झालेल्या भारापेक्षा मंडपातील विजेचा वापर जास्त होणार नाही याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

मदत उपलब्ध: आणीबाणीच्या परिस्थितीत त्वरित मदतीसाठी महावितरणने २४ तास उपलब्ध असलेले टोल–फ्री क्रमांक दिले आहेत, १९१२, १८००–२३३–३४३५. १८००–२१२–३४३५ किंवा ०२२–५०८९७१०० या क्रमांकावर मिस कॉल देऊनही संपर्क साधू शकता. मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी स्थानिक महावितरण अभियंता आणि ‘जनमित्रांचे’ मोबाईल क्रमांक जवळ ठेवावे, असं आवाहनही करण्यात आलं आहे.


अनामत रक्कम: सोपी प्रक्रिया, त्वरित परतावा: तात्पुरत्या वीज जोडणीसाठी मंडळांना त्यांच्या मंजूर वीजभाराप्रमाणे अनामत रक्कम भरावी लागेल. ही रक्कम ऑनलाईन भरल्यास, उत्सव संपल्यानंतर वीजबिलाची रक्कम वजा करून उरलेली रक्कम विनाविलंब परत केली जाईल. यामुळे रक्कम परत मिळवण्यासाठी वाट पाहावी लागणार नाही आणि मंडळाची प्रक्रिया अधिक सुलभ होईल.

## महिला सशक्तिकरण व आयुर्वेद डे निमित्त
# २३ ला शिराळा येथे भव्य रोग निदान व उपचार शिबिर

### पी. आर. पोटे पाटील आयुर्वेद कॉलेज चा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

पंतप्रधान नरेन्द्रजी मोदी यांच्या महिला सशक्तिकरण योजने अंतर्गत व आयुर्वेद डे निमित्त पी आर पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालय तथा प्राथमिक आरोग्य केंद्र शिराळा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. २३ सप्टेंबरला भव्य विनामूल्य रोग निदान व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पोटे आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने १३ सप्टेंबर पासून आयुर्वेद डे सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. त्यासोबतच महिला सशक्तीकरण अंतर्गत शिराळा येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.




शासनाच्या वतीने १७ सप्टेंबर पासून आरोग्य उपकेंद्रात छोट्या शिबिराद्वारे रुग्णाचे स्क्रीनिंग केल्या जात असून त्या सर्व रुग्णांची पूर्ण तपासणी शिराळा येथील २३ तारखेच्या शिबिरात केली जाईल. मुख्य वैद्यकीय अधीक्षक तथा प्राचार्य डॉ. श्याम भुतडा व नोडल ऑफिसर डॉ. स्वाती धामणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्री रोग तज्ञ दिपाली नवले, बालरोग तज्ञ डॉ अनिरुद्ध भोपळे, काय– चिकित्सा व पंचकर्म तज्ञ डॉ अनिकेत राऊत, कान नाक घसा तज्ञ व नेत्र तज्ञ डॉ. प्रियंका राऊत रुग्णांची तपासणी व सर्व उपचार हे करतील. उपरोक्त शिबिराचा परिसरातील गरजूंनी लाभ घ्यावा अशी विनंती डॉ. श्याम भुतडा तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षा गोहत्रे यांनी केले आहे.



# अमरावती महापालिकेतर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०अमरावती** – स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य दिशादर्शन मिळावे यासाठी अमरावती महानगरपालिकेतर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. णझडउ, चझडउ, राज्यसेवा, डढख, झडख तसेच इतर स्पर्धा परीक्षांसाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरणार आहे.या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. सौ. सौम्या शर्मा (चांडक) आयएएस, आयुक्त तथा प्रशासक अमरावती महानगरपालिका (२०१८ णझडउ –खठ ९) णझडउ संपूर्ण मार्गदर्शन करतील. तर श्री. महेश सुभाष पाटील, शाश्वत अकॅडमी, पुणे हे स्पर्धा परीक्षा इंग्रजी या विषयावर मार्गदर्शन करणार असून णझडउ, चझडउ, डढख–झडख, इरपज्ञळपस, डडउ व इतर परीक्षांच्या तयारीबाबत सविस्तर माहिती देणार आहेत.दिनांक : २४ सप्टेंबर २०२५ (बुधवार)वेळ : दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंतस्थळ : संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावतीया कार्यशाळेत सामान्य अध्ययन, संभाषण कौशल्य, मुलाखत तंत्र, करिअर सोपान या विषयांवर विशेष भर दिला जाणार असून विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा सुवर्णसंधी ठरणार आहे. सदर कार्यशाळेकरीता विद्यार्थ्यांचे नोंदणी करणे सुरु असून विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन अमरावती महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेसंदर्भात विद्यार्थ्यांना आवाहन करताना सांगितले की, अमरावती महानगरपालिकेतर्फे आयोजित करण्यात आलेली स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा ही UPSC, MPSC, राज्यसेवा, STI, PSI तसेच इतर विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. या कार्यशाळेत तज्ञ मार्गदर्शकांकडून मिळणारे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना अभ्यासाची योग्य दिशा ठरविण्यास, आत्मविश्वास वाढविण्यास तसेच करिअरमध्ये यश संपादन करण्यासाठी मोठी मदत करणार आहे.

# आर्वी ते कुऱ्हा बससेवा सुरू करण्याची पालकांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०आर्वी** गारडा, जहागीरपूर, मिर्चापूर, वंडली, शिदवाडी व कौडन्यापूर या गावांतील शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दररोज कुऱ्हा येथे जावे लागते. मात्र, सकाळच्या वेळेस त्यांच्यासाठी कोणतीही निश्चित एस.टी. बस उपलब्ध नसल्यामुळे अनेक विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे.



सध्या आर्वी येथून सकाळी १०.३० वाजता अगरावतीकडे जाणारी बस हाच एकमेव पर्याय आहे. परंतु ही बस मार्गातच प्रवाशांनी भरलेली येत असल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना जागा मिळत नाही. परिणामी ते कुऱ्हा शाळेत वेळेवर पोहोचू शकत नाहीत.या पार्श्वभूमीवर, वरील गावांतील विद्यार्थ्यांचे पालक संघटित होऊन आर्वी आगार व्यवस्थापकांकडे एक निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी मागणी केली आहे की, आर्वी ते कुऱ्हा दरम्यान सकाळी अशी बससेवा सुरू करण्यात यावी जी मार्डा येथे सकाळी १० वाजता पोहोचेल, जेणेकरून सर्व विद्यार्थी वेळेवर शाळेत पोहोचू शकतील.ही बससेवा सुरू झाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळेल आणि त्यांना नियमित शिक्षण घेता येईल, असा विश्वास पालकांनी व्यक्त केला आहे.

# स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियानांतर्गत भव्य आरोग्य शिबिर – नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०अमरावती**

अमरावती महानगरपालिकेच्या वतीने स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान अंतर्गत शहरी आरोग्य केंद्र, आयसोलेशन येथे दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभून शेकडो नागरिकांनी आरोग्य तपासणीचा व औषधोपचारांचा लाभ घेतला.या शिबिराचे आयोजन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनाखाली तर सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. सार्वजनिक आरोग्य विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर पार पडले. तसेच पर्यवेक्षणाची जबाबदारी डॉ. स्वाती कोवे (ठउकअधिकारी), डॉ. संदीप पाटबागे व डॉ. माधवी वानखडे यांनी समर्थपणे पार पाडली.शहरी आरोग्य केंद्राचे स्त्री वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी खडसे, डॉ. समिक्षा ढोले, डॉ. देवेंद्र गुल्हाने, पीएचएन अशहब अहमद, आरोग्य सेविका–सेवक, सर्व आशा वर्कर तसेच क्षउ आकोलीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.



अमित रुद्रकार व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेऊन शिबिर यशस्वी करण्यात मोलाचे योगदान दिले. या शिबिरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर तपासण्यांचा लाभ घेतला. मिळालेल्या आकडेवारीनुसार **एकूण तपासणी** : ६५३ऑनलाइन डाटा एन्ट्री : ६१०गरोदर माता तपासणी : ४६लसीकरण : ७७डोळ्यांची तपासणी : ६८त्वचेची तपासणी : ४०एक्स–रे तपासणी : ४८एनसीडी तपासणी : १६८आभा कार्ड : ५८रक्त तपासणी : ९२याशिवाय नागरिकांना औषधोपचारांची सुविधाही देण्यात आली. विशेष म्हणजे शिबिरात विविध आजारांबाबत जनजागृती करण्यात आली तसेच नागरिकांना पुढील उपचार व निरोगी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन देण्यात आले. महानगरपालिकेच्या या उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत केले असून, अभियानाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना दर्जेदार व मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# शिवराय कुलकर्णी यांचे तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालय दारापुर येथे जाहीर व्याख्यान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार केवळ एखाद्या राजकीय पक्षापुरते सीमित नव्हते, तर संपूर्ण मानवतेसाठी कल्याणाचे मंत्र होते. ‘इंटिग्रल ह्युमिनिझम’ अर्थात एकात्म मानव दर्शन हे त्यांच्या दर्शनाचे शीर्षक आहे. वैश्विक एकता, सर्जनात्मकता आणि सहकार हाच विकासाचा मार्ग आहे, संघर्ष किंवा संहार नाही, हे सौम्य स्वरात आपल्याला दीनदयाळजी या दर्शनातून समजावतात. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची २५ सप्टेंबर रोजी जयंती आहे. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट अमरावती द्वारा संचालित तक्षशिला महाविद्यालय, दारापुर आणि तक्षशिला अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, दारापुर यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती तसेच राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरी करण्यात येत आहे. .



या प्रसंगी दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रेक्षागृहात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जीवन प्रवासावर अमरावती येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि प्रसिद्ध वक्ते शी शिवराय कुलकर्णी यांच्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा कीर्तिताई अर्जुन, सचिव डॉ कमलाकर पायस, प्रा सचिन पंडित तसेच तक्षशिला अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी टी इंगोले व तक्षशिला महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. मल्लू पडवाल , राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ यशवंत हरणे , डॉ.संतोष यावले यांची उपस्थिती राहणार आहे.

दारापुर परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालयातील शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व विध्यार्थी तसेच समस्त नागरिकांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा व जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# नोव्हेंबरपर्यंत ज्वारी वाटप; 'लाडकी बहीण'च्या बोजामुळे आनंदाचा शिधा बंद

## सणासुदीत रेशनधारकांना गव्हाऐवजी मिळत आहे ज्वारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

सणांमध्ये सरकारी धान्य दुकानांतून रेशन कार्डधारकांना आनंदाचा शिधा देण्यात येत होता. तथापि, राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेनुसार १,५०० रुपये मासिक देण्याची योजना सुरू केल्यानंतर, ही योजना बंद करण्यात आली. रेशन कार्डधारकांना अपेक्षा होती की सरकारने सणांमध्ये रेशन कार्डधारकांना वाटण्यात येणाऱ्या गव्हाचे प्रमाण किमान वाढवावे. तथापि, सप्टेंबरमध्ये रेशन वितरण सुरू होताच, प्रत्येक सरकारी रेशन दुकान गव्हाऐवजी प्रतिव्यक्ती १ किलो ज्वारी आणि ४ किलो तांदूळ वाटप करत आहे. त्यामुळे सणासुदीच्या दिवसात लाभार्थींना ज्वारीच्या भाकरी खावी लागत आहे.



जिल्हा पुरवठा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सरकारी धान्य दुकानांमधून तांदळासोबत ज्वारीचे वाटप नोव्हेंबरपर्यंत सुरू राहील. याचा अर्थ असा की, सणांच्या काळात रेशनकार्डवर १ किलो ज्वारी आणि ४ किलो तांदूळ वाटप सुरू राहील. गव्हाऐवजी पुरवठा विभाग रेशन कार्डधारकांना ज्वारी वाटप करेल. हे लक्षात घेण्यासारखे आहे की जूनमध्ये पावसाळ्यामुळे सरकारी धान्य दुकानांमधून तीन महिन्यांसाठी रेशन वाटप करण्यात आले होते. त्यामुळे जुलै आणि ऑगस्टसाठी तीन महिन्यांचा कालावधी लागला.

महिनाभर सरकारी रेशन दुकाने बंद होती. तथापि, सप्टेंबरच्या सुरुवातीला अमरावती शहर आणि ग्रामीण भागातील एपीएल, बीपीएल आणि अंत्योदय कार्डधारकांना प्रतीयुनिट ४ किलो तांदूळ आणि १ किलो ज्वारी व सरकारी धान्य वाटप पुन्हा सुरू झाले. नोव्हेंबरपर्यंत सर्व रेशन दुकानांवर तांदळासह ज्वारी वाटप सुरू राहील. सणांच्या काळात गव्हाऐवजी ज्वारी वाटप केली जाईल.

# व्ही.एम.व्ही. आश्रमशाळेत ३५० विद्यार्थ्यांचे गोवर-रुबेला लसीकरण

## मनपा आरोग्य विभागाची मोहीम यशस्वी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने १५ सप्टेंबरपासून शहरातील आश्रमशाळांमध्ये गोवर-रुबेला प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत व्ही.एम.व्ही येथील रामकृष्ण विद्यालय आश्रमशाळेतील ३५० विद्यार्थ्यांना लसीकरणाचा लाभ मिळाला.

५ ते १५ वयोगटातील गोरगरीब, अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना गोवर-रुबेला आजारांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. मोहिमेची अंमलबजावणी मनपा आयुक्त सौम्या चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त मेघना वासनकर व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

या लसीकरणाचे संपूर्ण नियोजन लसीकरण सनियंत्रक पल्लवी भुसाटे यांनी केले असून त्यांनी यशस्वीरित्या ३५० विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण केले. या लसीकरणामुळे अतिसार, बहिरेपणा, अंधत्व, न्यूमोनिया, हृदयदोष, जन्मतः विकृती यांसारख्या गुंतागुंतीच्या



आजारांपासून मुलांचे संरक्षण होईल, असे साथरोग नियंत्रण अधिकारी डॉ. रुपेश खडसे यांनी सांगितले.पुढे बोलताना पल्लवी भुसाटे यांनी सांगितले की, १५ ते ३० सप्टेंबर दरम्यान शहरातील सर्व आश्रमशाळा व मदरशांमध्ये शिकणाऱ्या ५ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांचे मोफत लसीकरण करण्यात येणार आहे.मनपा आरोग्य विभागाच्या विद्या बारसे यांनी सर्व संबंधित शाळा व मदरशांना आवाहन केले की, जेथे गोवर-रुबेला लसीकरण आवश्यक आहे त्यांनी मनपा आरोग्य विभाग, अमरावती यांच्याशी त्वरित संपर्क साधावा.या यशस्वी लसीकरण मोहिमेत शाळेच्या मुख्याध्यापिका, डॉ. रुपेश खडसे, पल्लवी भुसाटे, सौ. विद्या बारसे, उमा जाधव, तसेच भाजीबाजार शहरी आरोग्य केंद्रातील आशा व ए.एन.एम. कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# पर्यावरणाची काळजी घेणे आपले प्रथम कर्तव्य : पोटे

## पोटे एज्युकेशनल ग्रुप गणेशोत्सव सजावट स्पर्धेचे बक्षीस वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा जगाचा विनाश व्हायला वेळ लागणार नाही. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून त्याची काळजी घेणे आपले प्रथम कर्तव्य आहे. यंदाची गणेशोत्सव सजावट स्पर्धेतील थीम पर्यावरणाशी निगडित असल्याने पर्यावरणाचे संतुलन, रक्षणाचा संदेश देणारे सार्वजनिक तरुण मंडळाने देखाव्यातून सादर करत जनजागृती केले, असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे यांनी केले.

पी. आर. पोटे एज्युकेशनल ग्रुपच्या वतीने यंदाही गणेशोत्सव सजावट स्पर्धा घेण्यात आली. सेवा पंधरवडा अभियानांतर्गत माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे यांच्या मार्गदर्शनात या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये पन्नास पेक्षा जास्त मंडळांनी सहभाग तर घरगुती गणेशोत्सव सजावटमध्ये ३५० पेक्षा जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवला होता. या वर्षी आयोजकांच्या वतीने विविध विषय देखाव्यासाठी दिले होते. यात पर्यावरणपूरक देखावा, सामाजिक संदेश देणारा देखावा,हिंदू सण उत्सव माहिती प्रदान करणारा देखावा, प्राचीन संस्कृती, कला, इतिहासाची माहिती देणारा देखावा, जनजागृती करणारा देखावा यांचा समावेश होता. स्पर्धेकरिता आलेल्या सर्व देखाव्यांचे तज्ञ परीक्षकांकडून निरीक्षण केल्यानंतर सार्वजनिक गणेशोत्सवात बजरंग गणेशोत्सव मंडळ पटवीपुराला प्रथम पारितोषिक व सन्मान चिन्ह देण्यात आले. शिवाजी गणेश मंडळ बारीपुरा बडनेरा यांना द्वितीय, तिसऱ्या क्रमांकासाठी बाल गणेश उत्सव मंडळ छत्रपती नगर विद्यापीठ कॉलनी यांची निवड केली आहे. तसेच घरगुती गणेश उत्सव सजावट स्पर्धेत एकूण २१ विविध रोख बक्षीस व सन्मानचिन्ह वितरण करण्यात आले.या वेळी एज्युकेशनल ग्रुप संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयस पोटे, शिक्राय कुलकर्णी, किरण महल्ले, किरण पातूरकर, भाजप शहर अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, दिनेश सूर्यवंशी, रवींद्र खांडेकर, चेतन पवार, सुरेखा लुंगारे, गंगा खारकर, सतीश करेसीया, विकी शर्मा, चंदू बोमरे तसेच भाजप पदाधिकारी व घरगुती मंडळ प्रतिनिधी, सार्वजनिक गणेश मंडळ कार्यकर्ते उपस्थित होते. स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रा. विशाल इंगोले, प्रा. संदीप जाधव, प्रा.आकाश कदम यांनी परिश्रम घेतले.

# मोर्शी कृऊबासमधील सीसीटीव्ही कॅमेरे बंद; चोरीचे प्रमाण वाढले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मोर्शी:**

कृषी उत्पन्न बाजारसमितीचे सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे चोरीचे प्रमाण वाढत आहे. यामुळे व्यापारी वर्गांना नाहक भूर्दड सोसावा लागत आहे

मोर्शी कृषी उत्पन्न बाजारसमितीमध्ये दोन दिवस मार्केट असल्यामुळे बरेच शेतकरी आपला शेतीमाल विक्रीकरिता आधी मार्केटमध्ये आणून व्यापाऱ्याच्या ओट्यावर ठेवला जाते. यामध्ये अनेक शेतकरी वर्गाचे धान्याचे पोते वव्यापाऱ्याने स्वतः विकत घेतलेल्या धान्याचे पोते आपला माल गोळा करून कृषी उत्पन्न बाजारसमितीच्या ओट्यावर ठेवतो त्याच ओट्यावरून १५ व १६ सप्टेंबरला विनय हिरालाल साबू व यश सचितानंद साबू या दोघांचे वेगवेगळ्या ठिकाणावरून दोन तुरीचे कट्टे त्याचे वजन २ क्विंटल २० किलो असून त्याचे बाजारभाव १६ हजार रुपये असून ही तूर लहा यांच्याकडून विकत घेतलेली होती. कृषी उत्पन्न बाजारसमितीच्चत्या शेडमध्ये सायंकाळी हे ठेवण्यात आले असता त्यामधून एक कट्टा, तर दुसऱ्या ठिकाणावरून एक कट्टा असे दोन तुरीचे पोते



चोरी गेल्याचे निदर्शनात आले. त्यावेळी ड्युटीवर असलेले दोन चौकीदार यांना याबाबत सागण्यात आले.

याबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव यांना लेखी तक्रार करण्यात आली व त्यानतर पोलिसस्टेशनमध्ये तक्रारकरण्यात आली. बरेच दिवसापासून सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे अनेकांना आश्चर्य वाटत आहे. ते सीसीटीव्ही कॅमेरे एखाद्या कर्मचाऱ्याने बंद केले काय, याबाबत शंका आहेयाआधी चोरीचे असे अनेक प्रकार कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये झाले आहे. सर्वात मोठ्या प्रमाणात येथे व्यापाऱ्यांचा लाखो रुपयांचा माल कृषी उत्पन्न बाजारसमितीमध्ये पडून राहतो. त्यामुळे येथे चौकीदाराची गस्त वाढवावी, सीसीटीव्ही कॅमेरे बंद होणार नाही, याचे नियोजन करावे. या सर्व बाबीची चौकशी करून व चोरांना अटक करण्यात यावी, अशी मागणी यावेळी होत आहे.

# २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम

## कौंडण्यपूरच्या अंबिका देवी संस्थानात शारदीय नवरात्रोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०कौंडण्यपूर**

कौंडण्यपूर येथील अंबिका देवी संस्थान मंदिरात यंदाही २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांनी आश्विन शारदीय नवरात्रोत्सव साजरा होणार आहे. यात श्रीमद् भागवत कथा व दीपोत्सव होमहवन व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजनही केले आहे.

दैनिक कार्यक्रमांत सकाळी ६.३० ते ७वा. देवी सहस्त्रनाम, सकाळी ७ ते ८ या वेळेत महापूजा आरती, ९ ते १२ या वेळेत दुर्गाशप्तशतीपाठ, दुपारी १२ ते १२.३० वा. धूप आरती सार, रात्री ८ ते ९ वा. विष्णुसहस्त्रनाम व हरिपाठ, रात्री ९ नंतर भजन यात महिला भजनी मंडळ व भजनी मंडळांचा समावेश राहील. तसेच श्री मनोकामना सिद्धीकरिता अखंड दीपज्योत २२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबरपर्यंत, ज्योत प्रज्वलन २२ सप्टेंबरला तर ज्योत विसर्जन कार्यक्रम १ ऑक्टोबरला दुपारी ४ वाजता होईल. तसेच श्रीमद् भागवत कथा कथाव्यास दामोदर महाराज बोबडे अमरावती व संच



यांचे मुख्य यजमान अंबिका देवी संस्थान विश्वस्त कौंडण्यपूर सकाळी ९ ते ११ व दुपारी ३.३० ते ५.३० या वेळेत राहील. काल्याचे भजन १ ऑक्टोबरला सकाळी १० ते दुपारी १२ वा. कौंडण्यपूर देऊरवाडा भजन मंडळ यांच्या हस्ते होईल. आश्विन शारदीय नवरात्रोत्सव २२ सप्टेंबरला सकाळी ८ ते ९ वा. श्री पूजा अभिषेक यजमान गिरधर अग्रवाल व चेतन अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात येईल.

तसेच ९.३० ते १०.३० वा. घटस्थापना यजमान विश्वस्त मंडळ कौंडण्यपूर, दीपज्योती प्रज्वलन रमेशचंद्र राठी, भागवत ग्रंथ आरंभ पूजन भय्यासाहेब ठाकरे स विश्वस्त, रात्रीचे भजन हनुमान भजन है मंडळ कौंडण्यपूर यांचे राहील. म नवरात्रोत्सवात दैनंदिन पाद्यपूजा व महापूजा स आरती व परिसरातील महिला भजन मंडळ प्र व भजनी मंडळाचा समावेश राहील. ३० अ सप्टेंबरला सायं. ५.३० वाजता होम हवन क प्रारंभ होईल तर २ ऑक्टोबरला पूर्णाहुती सकाळी ८ वाजेपर्यंत राहील. कौंडण्यपूर घ देऊरवाडा भजनी मंडळाद्वारे दुपारी १२ ते ३ स वाजेपर्यंत महाप्रसाद वितरण होईल. वि भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन अंबिका देवस्थान कमिटीद्वारे करण्यात आले.

# नवरात्रीपूर्वी पोलिस अधिकाऱ्यांची मंडळांना भेट शांततेत उत्सव साजरा करण्याचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नांदगाव पेठ**

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने दक्षता घेतली असून पोलिस उपायुक्त गणेश व नांदगाव पेठ पोलिसस्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांनी नांदगाव पेठ परिसरातील विविध नवदुर्गा मंडळांना भेट देत पाहणी केली. यामध्ये विशेषतः बारीपुरा येथील प्रसिद्ध असलेल्या कालीमाता मंडळास भेट देऊन मंडपाची रचना, सुविधा व सुरक्षिततेची पाहणी करण्यात आली.

यावेळी अधिकाऱ्यांनी मंडळांना काही मार्गदर्शक सूचना देत भक्ताना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, यासाठी काळजी घेण्याचे आवाहन केले. पावसाळ्याचे दिवस असल्याने मंडप वॉटरप्रूफ ठेवणे, गर्दी नियंत्रणाची पूर्वतयारी करणे, तसेच शांतता व सुव्यवस्था राखणे यावर त्यांनी विशेष भर दिला. नवरात्रोत्सव सर्वांनी उत्साहात आणि आनंदात साजरा करावा, असे आवाहन करत सर्व मंडळांना शुभेच्छाही दिल्या. गणेश विसर्जनाचा कार्यक्रम शांततेत पार पडल्याबद्दल कालीमाता मंडळाच्या तीने पोलिस उपायुक्त गणेश शिंदे व पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊनसत्कार करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष प्रफुल्ल पोकळे यांच्यासह मंगेश गाडगे, मंगेश तायडे, जगदीश इंगोले, संदीप पोकळे, विनोद कुऱ्हाडे, प्रभुदास क्षीरसागर, शुभभ इंगोले, विपीन कुऱ्हाडे, उमेश आवणकर, राहुल भोपळे, शरद भगल, हर्षद दारोकार, वैभव मुळे, ऋषिकेश गाडगे, गोपालपोकळे, वैभव पकडे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व मोठ्यासंख्येने नागरिक उपस्थित होते.

# अतिवृष्टीमुळे शेतातील विहिरी खचल्या

## पापळ, वाढोणा (रामनाथ) येथील शेतकऱ्यांचे नुकसान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०पापळ**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यात पापळ, वाढोणा रामनाथ येथे गेल्या आठ दिवसांपासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, त्यामध्ये शेतातील सिमेंट काँक्रीटच्या बांधलेल्या विहिरीसुद्धा खचल्या आहे. सततच्या पावसामुळे जमिनीमध्ये दलदल निर्माण होऊन पापळचे शेतकरी उमेश बलखंडे, वाढोणा रामनाथचे शेतकरी नंदकिशोर प्रल्हाद माटोडे, तर १६ सप्टेंबरला शेतकरी राजेंद्र उत्तमराव माटोडे यांच्या शेतातील विहीर खचली असून त्यामध्ये तीनही शेतकऱ्यांचे मोटरपंप गाळात फसले आहे. हे दोन्ही शेतकरी अल्पभूधारक असून अतिवृष्टीमुळे प्रत्येकी दीड लाखांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचा महसूल विभाग व कृषिविभाग यांनी संयुक्तरित्या पंचनामा करावा, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे.

# सोन्याचे दागिने व ३५ हजार रुपये घेऊन अल्पवयीन मुलगी भुर्रऽऽऽ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०दर्यापूर**

कपाटातील सोन्या-चांदिचे दागिने व ३५ हजार रुपये नगदी घेऊन अल्पवयीन मुलगी घरून बेपत्ता झाल्याची घटना सप्टेंबररोजी दर्यापूर पोलिस स्टेशन हद्दीत घडली. १७

४१ वर्षीय इसमाने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली की, त्यांची १५ वर्षे वयाची मुलगी १७ सप्टेंबरच्या सकाळी १०.३० वाजता शाळेत गेली, परंतु ती सायंकाळी घरी परत आली नाही.



वडिलांनी शाळेत जाऊन चौकशी केली असता मुलगी शाळेतच आली नसल्याचे समजले. घरी येऊन त्यांनी कपाटात पाहिले असता २ तोळे सोन्याचे दागिने व नगदी ३५ हजार रुपये घेऊन ती पळून गेली. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# भाऊ हॅप्पी बर्थ डे!.....



अमरावती महानगरपालिका माजी स्थायी समिती सभापती मा. श्री.तुषार भारतीय यांच्या आज वाढदिवसाच्या निमित्याने त्यांच्या राहत्या घरी अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता.या वेळी शहरातील राजकीय,सामाजिक,क्रीडा,कृषी क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्यात.

# पोलीस असल्याचा बनाव करून दागिने लंपास करणारी कुख्यात ईराणी टोळी गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी दबंग कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

अमरावती ग्रामीण भागात आणि शेजारच्या जिल्ह्यांमध्ये पोलीस असल्याचा बनाव करून ज्येष्ठ नागरिकांना लुटणाऱ्या कुख्यात ईराणी टोळीचा पर्दाफाश करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई करत साताऱ्यांपासून ते ठाण्यापर्यंत दहशत माजवणाऱ्या चार आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून २२१ ग्रॅम सोन्याचे दागिने, खोटे पोलीस ओळखपत्र, प्रेस कार्ड्स आणि वाहनासह एकूण २९ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून तळेगाव, वरूड, मोशी, तिवसा, परतवाडा भागात अशा फसवणुकीचे प्रकार घडत होते. आरोपी रस्त्यात नागरिकांना थांबवून आम्ही पोलीस आहोत, पुढे खून झाला आहे, दागिने सुरक्षित ठेवावेत असं सांगून हातचलाखीने सोन्याचे दागिने लंपास करत होते.

स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासात बिड जिल्ह्यातील जहीर अब्बास ऊर्फ मोटा, ठाण्याचा गांधी ऊर्फ समीर शेख, कर्नाटकातील वसीम शब्बीर आणि नझीर अली या चार जणांना अटक करण्यात आली. या टोळीवर महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, बिहार, छत्तीसगड, तेलंगणा आणि झारखंड या राज्यांतील २५ पेक्षा अधिक गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कार्यवाही विशाल आनंद, पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण, पंकज कुमावत, अपर पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.किरण वानखडे यांचे नेतृत्वातील पो.उप.नि. सागर हटवार, मुलचंद भांबुरकर, पोलीस अंमलदार पोहवा बळवंत दाभणे, गजन्द्र डाकरे, रविन्द्र बावणे, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोनीया, पंकज फाटे, सचिन मिश्रा, सागर धापड, शिवा शिरसाट, प्रशिक वानखडे, मनोज ढवळे यांचे पथकाने केली आहे.

# सुपरस्पेशालिटी रुग्णालय ठप्प, रुग्णांचे हाल

## काँग्रेसचा महायुती सरकारविरुद्ध हल्लाबोल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

अमरावती सुपरस्पेशालिटी रुग्णालयातील ६० हून अधिक डॉक्टर आणि कर्मचारी गेल्या २५ दिवसांपासून संपावर आहेत. त्यांचे ९ कोटी मानधन थकित असून, सध्याच्या महायुती सरकारने अद्याप कोणताही तोडगा काढलेला नाही. त्यामुळे किडनी ट्रान्सप्लांट, हृदयरोग, डायलिसिस, प्लास्टिक सर्जरीसारख्या गंभीर उपचार बंद असून, २०० हून अधिक रुग्णांची शस्त्रक्रिया रखडली आहे.

या पार्श्वभूमीवर अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आंदोलन करण्यात आले. महायुती सरकारने गरीब रुग्णांच्या उपचाराचे आणि डॉक्टरांच्या वेतनाचे पैसे गिळले, असा घणाघात काँग्रेस शहराध्यक्ष बबलु शेखावत यांनी केला.

सुपरस्पेशालिटी रुग्णालय काँग्रेस सरकारच्या दूरदृष्टीने उभे राहिले, पण महायुती सरकारच्या नाकर्तेपणामुळे बंद पडले, असा आरोपही यावेळी करण्यात आला. रुग्ण आणि नातेवाईकांनी आंदोलनात सहभागी होऊन आपली व्यथा सांगितली. काहींना उपचाराअभावी जीव गमवावा लागला आहे, ही अत्यंत दुःखद बाब असल्याचे काँग्रेसने म्हटले. महायुती सरकार होश मे आओ, डॉक्टरांचे पैसे खाणाऱ्या सरकारचा निषेध असो अशा घोषणा देत रुग्णालय परिसर दणाणून गेला.

काँग्रेसने स्पष्ट केले की, जोपर्यंत रुग्णालय सुरळीत होत नाही आणि डॉक्टरांना मानधन मिळत नाही, तोपर्यंत हा लढा सुरू राहील. आंदोलनात माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख, शहर अध्यक्ष बबलू शेखावत माजी महापौर विलास इंगोले,माजी महापौर मिलिंद चिमोटे,जेष्ठ नेते बाळासाहेब भुयार,प्रदेश महासचिव किशोर बोरकर,मुन्ना राठोड,संजय वाघ,विनोद मोदी,अशोक डोंगरे,मोहम्मद साबीर,सलीम मिरावाले,भैय्यासाहेब निचळ,राजीव भेले,संजय बोबडे,अफजल चौधरी,निलेश गुहे,संकेत कुलट,वैभव देशमुख,समीर जवंजाळ,नितीन काळे,फिरोज शाह,विजय वानखडे,सुनील जावरे,गजानन जाधव,कुणाल सोनी,अमित गावंडे,स्वप्नील साव,वंदना थोरात,शिल्पा राऊत,लक्ष्मी अहिरे,किरण चांदवडकर,प्रशांत महल्ले,राम चव्हाण,विजय खंडारे,डॉ.मतीन अहेमद,अभिनंदन पेंढारी,सुरेश अतकरे,श्रीधर पुरोहित,प्रकाश पहूरकर,सोमेश्वर मुंजाळे, प्रा.बी.टी.अंभोरे,छत्रपती राऊत, मडावी साहेब,अशोक राऊत,अनिल तायडे,मेराज खान पठाण,राजू मसराम,अशफाक भाई,डॉ.मझहर अली,सोनू शाह,अतुल काळबेंडे,मिलिंद अहिरे,सतीश मेटांगे,अमर देशकर,सचिन निकम,संजय मोरे,किशोर रायबोले,सुरेश रतावा,प्रा.अनिल देशमुख,पंकज मांडळे,सादिक अली हारून अली,जमीर खान,कृष्णा गुगलमाने,मोहम्मद शरीफ,सौरभ तायडे,प्रफुल तंतरपाळे,गोविंद ठाकरे,आकाश धुराटकर,उमेश वानखडे,शुभम बांबल,धनंजय बोबडे,निशांत पवार,साहिल वानरे,अभिषेक भोसले,सम्यक वानखडे यांच्या सह अनेक पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोमवार २२ सप्टेंबरपासून शारदीय नवरात्रारंभ

## श्री अंबादेवी संस्थानकडून जय्यत तयारी

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.२०अमरावती**

विदर्भाची कुलस्वामिनी श्री अंबादेवीचे शारदीय नवरात्रोत्सव यंदा सोमवार, २२ सप्टेंबर २०२५ पासून हर्षोल्हासात सुरू होणार आहे. श्री अंबादेवी संस्थानतर्फे यासाठी जय्यत तयारी करण्यात आली असून, भक्तांसाठी विविध धार्मिक कार्यक्रम व सुविधा नियोजित करण्यात आल्या आहेत.



सकाळी ४.३० वाजता वेदमंत्रोच्चारात घटस्थापना व अभिषेक विधी होणार असून, सकाळी ८ वाजता ध्वजारोहण होईल. बुधवार, २४ सप्टेंबर रोजी दुपारी २ ते ३ दरम्यान तपोवनवासी बंधू-भगिनी दर्शनासाठी येणार असल्याने त्या वेळेत सर्वसामान्य भक्तांसाठी दर्शनाची व्यवस्था बंद राहणार आहे.

२६ सप्टेंबर रोजी ललिता पंचमी निमित्त विशेष पूजा, तर बुधवार, १ ऑक्टोबर रोजी १२.३० वाजता नवचंडी याग सुरू होऊन, सायंकाळी ७ वाजता पूर्णाहुती होईल. यानंतर २ ऑक्टोबर रोजी अंबादेवी व एकवीरा देवीची संयुक्त पालखी सिमोल्लंघनासाठी निघेल.

मंदिर सकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत खुले राहील. पूर्वेकडून पुरुष व स्त्रियांसाठी स्वतंत्र प्रवेश, स्त्रियांसाठी ओटी भरण्याची खास व्यवस्था, दक्षिणद्वारातून एकवीरा देवीच्या दर्शनाचा मार्ग, तसेच वृद्ध व दिव्यांगांसाठी उत्तरद्वारातून विशेष प्रवेश ठेवण्यात आला आहे.आपत्कालीन वैद्यकीय कक्ष, पोलीस चौकी, व रोज १० ते १२ दरम्यान भोजनप्रसादाची व्यवस्था (३० रु. शुल्क) ही सेवा देखील मर्यादित संख्येसाठी उपलब्ध असेल.

२२ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर दरम्यान, सकाळी ८.३० ते १०.३० या वेळात संत सचिन देव महाराज यांचे मम गुरुचरित्र महात्म्य या विषयावर प्रवचनमाला श्री अंबादेवी कीर्तन सभागृहात होणार आहे. तसेच, रोज विविध भजन मंडळींद्वारे भक्तिगीतांचे सादरीकरण होईल.श्री अंबादेवी संस्थानने सर्व भाविकांना आवाहन केले आहे की, शिस्तबद्धतेने व भक्तिभावाने दर्शनाचा लाभ घ्यावा आणि संस्थानच्या नियोजनास सहकार्य करावे असे आवाहन मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# त्या २४८ शेतकऱ्यांना तीन महिन्यांत कर्जमाफी द्या, उच्च न्यायालयाने राज्य सरकारला झापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

अकोला येथील २४८ शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेअंतर्गत तीन महिन्यांमध्ये कर्जमाफीचा लाभ द्या, असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने राज्य सरकारला दिला. तसेच, या शेतकऱ्यांना सात वर्षापासून कर्जमाफीच्या लाभापासून वंचित ठेवल्यामुळे सरकारची कानउघाडणी केली.

यासंदर्भात सेंट्रल कृषक सेवा सहकारी सोसायटीने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. नापिकी, दुष्काळ व कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये आणि शेतकऱ्यांना कर्जातून मुक्त करून पुन्हा शेती करण्यासाठी सक्षम करणे या उद्देशातून राज्य सरकारने २०१७ साली छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना आणली होती. सोसायटीच्या २४८ शेतकरी सदस्यांना या योजनेच्या लाभासाठी पात्र ठरविण्यात आले होते. त्यापैकी




२२९ सदस्यांना एक लाख ५० हजारांपर्यंत तर,१९ सदस्यांना २५ हजार रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार होती. हा लाभ तातडीने मिळणे अपेक्षित होते. परंतु, राज्य सरकारने या शेतकऱ्यांना सात वर्षांपासून झुलवत ठेवले आहे. त्यांना अद्याप कर्जमाफीचा लाभ देण्यात आला नाही. न्यायालयाने ही बाब लक्षात घेता सरकारवर प्रचंड नाराजी व्यक्त करून संबंधित आदेश दिला.न्यायालयाने या प्रकरणावर येत्या १२ डिसेंबर रोजी पुढील सुनावणी निश्चित करून राज्य सरकारला या तारखेपर्यंत आदेशाच्या अंमलबजावणीचा अहवाल सादर करण्यास सांगितले. तसेच, आदेशाची अंमलबजावणी करण्यात अपयश आल्यास आणि त्यासंदर्भात असमाधानकारक स्पष्टीकरण मिळाल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर अवमान कारवाई करण्यात येईल, असा इशारा दिला.पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी झालेल्या विलंबाकरिता राज्य सरकारने न्यायालयाला पोर्टल समस्येसह विविध तांत्रिक कारणे सांगितली. तसेच, महाआयटी कंपनीने राज्य सरकारला सादर केलेला प्रस्ताव मंजूर होताच लाभवाटपासाठी आवश्यक कार्यवाही केली जाईल, अशी ग्वाही दिली. परंतु, यामुळे न्यायालयाचे समाधान झाले नाही. न्यायालयाने सरकारचे स्पष्टीकरण अमान्य केले.

# निष्ठेने काम करूनही गद्दारीचा शिक्का मग पक्षात राहायचे कशाला?

## काँग्रेसच्या दोन गटातील शीतयुद्ध टोकाला प्रा. पुरके-देशमुख यांच्या एकाच दिवशी वेगळ्या सभा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०कळंब**

मागील काही महिन्यांपासून कळंब तालुक्यात काँग्रेसच्या दोन गटांत चांगलेच शीतयुद्ध रंगले आहे. दोन्ही गटांनी मागील आठवड्यात एकाच दिवशी स्वतंत्र बैठका घेऊन कार्यकर्त्यांशी चर्चा केली. काँग्रेसमधील प्रवीण देशमुख गटाने राष्ट्रवादीची कास धरण्याचा निर्णय पक्का केला आहे. त्यामुळे काँग्रेसमधील दोन गटांतील शीतयुद्धाला पक्षांतरानंतर पूर्णविराम मिळणार आहे.




प्रा. वसंत पुरके यांनी शहरातील एका आश्रमशाळेवर त्यांच्या गटातील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची बैठक घेतली. तत्पूर्वी नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत प्रवीण देशमुख गटाने काँग्रेस पक्षाच्या विरोधात काम केल्याची तक्रार पक्षश्रेष्ठींकडे केली. त्यामुळे या बैठकीत गद्दारीचा विषय चांगलाच गाजला. अपवाद वगळता बहुतांश कार्यकर्त्यांनी एकनिष्ठेने काँग्रेस पक्षाचे काम केले. असे असले तरी जबाबदार व्यक्तीने पक्षविरोधी काम केले का? त्याचा कोणाकडे पुरावा आहे का? पुरावा असेल तर तो सादर करावा. पुरावा नसेल तर वैयक्तिक हेवेदाव्यासाठी काँग्रेस पक्षाचे नुकसान करू नये, असे मत या बैठकीत प्रा. पुरके यांच्या समक्ष काही कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

विधानसभेतील पराभव हा नियोजनाचा अभाव व 'रसद' पुरवठा न झाल्याने ओढवलेला आहे. याला कार्यकर्ते नाही तर नेते जबाबदार आहेत, असेही मत मांडण्यात आले. यावेळी काँग्रेस तालुकाध्यक्षांच्या कार्यशैलीवर काहींनी रोष व्यक्त केला. तसेच अध्यक्ष बदलण्याची मागणीही लावून धरली. प्रवीण देशमुख गट काँग्रेस पक्ष सोडण्याच्या मानसिकतेत आहे. त्यामुळे प्रा. पुरके हे आपल्या कार्यकर्त्यांची बैठक घेऊन काँग्रेसमधील मंडळींना पक्षांतरापासून थोपवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बैठक घेण्यात आल्याची माहिती आहे. प्रवीण देशमुख यांनी कळंब येथे घेतलेल्या बैठकीत निष्ठेने काम करूनही गद्दारीचा शिक्का बसत असेल, तर काँग्रेसमध्ये राहायचे कशाला? असा सवाल केला.

# नवरात्रीतील नऊ रंगांचे महत्व काय? पाहुयात यंदा नवरात्रीत कोणत्या दिवशी कोणते रंग घालावेत...!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

नवरात्रोत्सवात देवी दुर्गाच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. त्याचसोबत व्रतवैकल्य देखील केले जातात. हिंदू धर्मातील हा अतिशय मोठा उत्सव मानला जातो. नवरात्रीत देवीच्या व्रत आणि पूजेसोबतच गरबा दांडिया देखील खेळले जातात. गरबावर पारंपरिक नृत्य केले जाते. असा हा उत्सव आणखी एका गोष्टीसाठी ओळखला जातो ती म्हणजे नवरात्रीतील रंग. नवरात्रोत्सवात प्रत्येक दिवशी एक रंग परिधान केला जातो. यंदा नवरात्रीत कोणत्या दिवशी कोणता रंग आहे हे जाणून घेऊयात.



### नवरात्रीच्या कोणत्या दिवशी कोणता रंग

सप्टेंबर २२, २०२५, सोमवार : पांढरा
सप्टेंबर २३, २०२५, मंगळवार : लाल
सप्टेंबर २४, २०२५, बुधवार : निळा
सप्टेंबर २५, २०२५, गुरुवार : पिवळा
सप्टेंबर २६, २०२५, शुक्रवार : हिरवा
सप्टेंबर २७, २०२५, शनिवार : करडा
सप्टेंबर २८, २०२५, रविवार : नारिंगी
सप्टेंबर २९, २०२५, सोमवार : मोरपंखी
सप्टेंबर ३०, २०२५, मंगळवार : गुलाबी

**नवरात्रीतील रंगाचे महत्व**

नवरात्रोत्सव आला की महिला विशेष करून अति उत्साही पहायला मिळतात. कारण नवरात्रीतील नऊ रंग याकाळात परिधान करण्यासाठी त्या आतुर असतात. नवरात्रीत एक विशिष्ठ रंग वेगवेगळ्या दिवशी घातला जातो. नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीला समर्पित असल्याने याकाळात विविध रंग परिधान करून स्त्रीशक्तीच्या रुपांना गौरविण्यात येते. नवरात्रीच्या रंगांना शास्त्रोक्त किंवा धार्मिक महत्व नाही. गेल्या काही वर्षांपासून नवरात्रीत विविध रंग घालण्याची प्रथा सुरु झाली आहे. सर्वज ही प्रथा अगदी आनंदाने फॉलो करताना दिसतात. त्यामुळे दरवर्षी नवरात्रोत्सव जवळ आला की रंगांची जमवाजमव सुरु होते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत